रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २६७
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, १५ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

पंडित पाटील यांच्यासमवेत अनेक कार्यकर्ते करणार भाजप प्रवेश/२
धार्मिक स्थळांवरील अनधिकृत भोंग्यांवर कारवाईची मागणी/५
द व्हॅली रनमध्ये वेदांत शिंदे व्दितीय/८

## सॅटेलाईटवर आधारित टोल प्रणाली येणार –ना. गडकरी



**मुंबई :** टोलनाक्यांवरील रांगा कमी करण्याकरिता केंद्र सरकारने नवी यंत्रणा राबवण्याचा विचार केला आहे. याबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी माहिती दिली. ते दादरच्या अमर हिंद मंडळाच्या वसंत व्याख्येनमालेत बोलत होते. टोलबद्दल मी जास्त सांगणार नाही, पण १५ दिवसांच्या आत अशी पॉलिसी येईल की, टोलबद्दल तुमची कोणतीही तक्रार असणार नाही. आपण सॅटेलाईट बेस फ्री टोलिंग सिस्टिम तयार करतोय. यामुळे टोलनाके राहणार नाहीत. तुम्हाला कोणी अडवणार नाही. कॅमेऱ्याद्वारे तुमच्या नंबरप्लेटवरून टोल निघेल. तुम्ही जिथून निघालात तिथपासून तुम्ही जिथून बाहेर पडाल तिथपर्यंतचाच टोल तुमच्या बँक खात्यातून कापला जाईल, असे ना. गडकरींनी सांगितले. मुंबई–गोवा महामार्गासाठीही खूप अडचणी आल्या, पण जूनपर्यंत हा रस्ता पूर्ण होईल, असेही ते म्हणाले.

# संविधानाच्या माध्यमातून देशाची एकता कायम : मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

संविधानाच्या माध्यमातून देशाची एकता आणि अखंडता कायम ठेवण्याचे अमूल्य कार्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. त्यांनी प्रत्येक नागरिकाला जगण्याचा अधिकार, संधीची समानता आणि आपली स्वप्ने साकार करण्याचा विश्वास दिला, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले. ते सोमवारी (दि. १४) चैत्यभूमी येथे महामानव डॉ. आंबेडकरांच्या १३४व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमास राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड, मुख्य सचिव सुजाता सैनिक, मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांची प्रमुख उपस्थिती होती.



संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे की, भारताचे संविधान हे माझ्यासाठी सर्वोच्च आहे. भारताच्या विकासात आणि प्रगतीच्या

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन

दिशेने देशाला पुढे नेण्यात संविधानाची भूमिका मोलाची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जडणघडणीत शिक्षण, सामाजिक न्याय, औद्योगिक विकास आणि मानवी हक्कांचे जसे मोलाचे योगदान आहे तसेच आधुनिक भारताच्या संरचनेतही त्यांचे कार्य अतुलनीय असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यामुळे आजचा आधुनिक भारत घडला असून त्यांच्या विचारांचे पालन करून संविधानिक मूल्यांप्रती निष्ठा ठेवणे हीच त्यांच्या जयंतीला खरी आदरांजली ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजपरिवर्तनाचे, सामाजिक, आर्थिक समतेवर आधारित समाजाचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

कार्यक्रमास भन्ते डॉ. राहुल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह दादर चैत्यभूमी स्मारक समितीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या वेळी मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले तसेच हेलिकॉप्टरमधून चैत्यभूमीवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

## बाबासाहेबांनी सामाजिक न्यायाची व्यवस्था उभी केली -पीएम मोदी

**हिसार : वृत्तसंस्था**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात सामाजिक न्यायाची व्यवस्था केली होती, मात्र त्यातही खंजीर खुपसून काँग्रेसने संविधानाच्या या तरतुदींना लांगूलचालनाचे माध्यम बनवले. सत्ता लुटण्याचे करण्याचे एक हत्यार म्हणून काँग्रेसने संविधानाचा वापर केला, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हल्लाबोल केला आहे.



हरियाणातील हिसार येथून अयोध्येसाठी व्यावसायिक विमानसेवेला पंतप्रधान मोदींनी सोमवारी (दि. १४) हिरवा झेंडा दाखवला तसेच हिसारमधील महाराजा अग्रसेन विमानतळाच्या नव्या टर्मिनल इमारतीची पायाभरणी केली. त्या वेळी बोलत होते.

काँग्रेसने केवळ काही कट्टरपंथीयांनाच खूश केले. उर्वरित समाज दयनीय, अशिक्षित आणि गरीब राहिला. काँग्रेसच्या या वाईट धोरणाचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे वक्फ कायदा. एवढेच नाही तर काँग्रेस एखाद्या मुस्लीम नेत्याला अध्यक्ष का बनवत नाही, असा सवालही पंतप्रधान मोदींनी या वेळी उपस्थित केला.

## पनवेलमध्ये मिरवणुकीसह विविध उपक्रमांनी डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त पनवेल महापालिकेच्या वतीने लोकसहभागातून ढोल–ताशा, लेझीम, चित्ररथांसह भव्य मिरवणुकीचे आयोजन सोमवारी (दि. १४) करण्यात आले. त्याचबरोबर निबंध, वक्तृत्व स्पर्धांसारखे विविध उपक्रम आयोजित करून जयंती उत्सवात साजरा झाला.

प्रारंभी सकाळी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आयुक्त मंगेश चितळे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह **(पान २ वर..)**

## जय भीम!



**पनवेल : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन केले.**

## निवडक

### अभिनेता सलमान खानला पुन्हा जीवे मारण्याची धमकी

**मुंबई :** बॉलीवूड अभिनेता सलमान खानला पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी आली आहे. सलमानची गाडी बॉम्बने उडवून देण्याची धमकी मुंबई पोलिसांच्या वाहतूक विभागाच्या व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर आली आहे तसेच सलमानच्या घुसून त्याला बॉम्बने उडवू, असेही त्यात म्हटलंय. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात वरळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून तपास सुरू आहे.

### पोलादपूर बाजिरे येथे गोठा आगीत खाक, चार गुरे दगावली

**पोलादपूर :** तालुक्यातील बाजीरे गावाच्या हद्दीमध्ये सोमवारी (दि. १४) सायंकाळी ५ वाजता भीषण वणवा लागला आणि या वणव्यामध्ये चार गुरे दगावल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार सोमवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास बाजीरे गावच्या हद्दीमध्ये भीषण वणवा लागला होता. या वणव्यामुळे शेतकरी सूर्यकांत नथुराम सावंत यांचा गुरांचा गोठा जळून खाक झाला. यात एक गाय, दोन बैल व एक वासरू अशी चार गुरे दगावली आहेत.

## शिवसेना मी वाढवली, दानवे नंतर आले अन् काड्या करतात!

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या छत्रपती संभाजीनगरमध्ये झालेल्या कार्यक्रमाला माजी खासदार चंद्रकांत खैरे गैरहजर होते. खैरे यांनी मेळाव्याला दांडी मारल्याची चर्चा होती, मात्र आपल्याला या कार्यक्रमाला बोलविलेच गेले नाही, असा सूर त्यांनी लावला आहे. तसेच विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंवर जोरदार टीका केली आहे.



**माजी खासदार चंद्रकांत खैरे संतापले; उद्धव ठाकरेंकडे करणार तक्रार**

मेळाव्याचे अंबादास दानवे यांनी मला सांगितले नाही. मी याबाबत उद्धवसाहेबांकडे तक्रार करणार आहे. अंबादास मोठा झाल्यासारखा वागतो. शिवसेना मी वाढवली. हा नंतर आला आणि काड्या करण्याचे काम करतो. तो मला बोलतच नाही, अशा शब्दांत खैरे यांनी दानवेंबद्दल आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली आहे.

ते पुढे म्हणाले, मेळाव्याला दांडी मारली म्हणणे अतिउत्साही आहे. मला आमंत्रण नव्हते, पत्रिकेत माझे नाव नव्हते. नागपूरमध्ये दोन महिन्यांपासून ठरलेला कार्यक्रम होता, मी तिकडे गेलो होतो, मात्र कालच्या पक्षाचा कार्यक्रम असल्याबाबत मला कुणी सांगितले नाही. कार्यकर्त्यांसोबत मलाही बोलायचे होते, पण मी नसताना यांनी कार्यक्रम उरकला, असे खैरे म्हणाले.

काही लोक काड्या करत राहतात. अनेक जण कुठे कुठे जातात, कोण कसे सेटलमेंट करतात मला माहिती आहे. कार्यक्रम असा अचानक होतो का? मी स्वतः कार्यक्रमासाठी छोट्या मोठ्यांना फोन करतो, असे सांगून दानवेंमुळे शिवसेनेतील अनेक लोक फुटले. या माणसाने काय केले सांगा. अनेक लोक सोडून जात आहेत, अशी टीका खैरे यांनी केली.

## मुंबईतील टँकरवाल्यांचा संप अखेर मिटला!

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेला मुंबईतील टँकर असोसिएशनचा संप अखेर सोमवारी (दि. १४) मागे घेण्यात आला. मुंबई टँकर असोसिएशनसोबत झालेल्या चर्चेनंतर शिवसेना आमदार मुरजी पटेल यांनी याबाबत पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.

मुंबईतील पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरवाल्यांनी बुधवार मध्यरात्रीपासूनच संप पुकारला होता. त्यामुळे मुंबईतील अनेक बांधकामे, ऑफिसेस, मॉल आणि इतर ठिकाणी या संपाचा फटका बसत होता. अनेक कामे ठप्प झाल्याचे पहायला मिळाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणाची दखल घेत संप मिटवण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी टँकरमालकांच्या शिष्टमंडळाची तातडीची बैठक बोलावली. महापालिकेने लागू केलेल्या आपत्ती व्यवस्थापन कायद्यासह चिघळलेल्या संपावर बैठकीत तोडगा निघाला आणि टँकर असोसिएशनने संप मागे घेतला. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टळणार आहे.

## गुजरातमध्ये १८०० कोटींचे ड्रग्ज जप्त

**पोरबंदर : वृत्तसंस्था**

गुजरातमध्ये भारतीय तटरक्षक दलाने ३०० किलो ड्रग्ज जप्त केले आहे, ज्याची किंमत सुमारे एक हजार ८०० कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. गुजरात दहशतवादविरोधी पथक (एटीएस) आणि तटरक्षक दलाने १२–१३ एप्रिलच्या रात्री संयुक्त कारवाईत पोरबंदरपासून १९० किमी अंतरावर समुद्रात ही कारवाई केली.



गुजरात एटीएसकडून माहिती मिळाल्यानंतर तटरक्षक दलाने शोधासाठी आंतरराष्ट्रीय सागरी सीमा रेषेकडे एक जहाज पाठवले होते. अंधारात तटरक्षक दलाच्या पथकाला एक बोट दिसली. पथकाने बोटस्वारांना त्यांची ओळख सांगण्यास सांगितले. त्या वेळी घाबरून तस्करांनी ड्रग्ज समुद्रात फेकून दिले आणि आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून ते पळून गेले.

तटरक्षक दलाच्या पथकाने बचाव बोटीच्या मदतीने समुद्रात टाकलेल्या ड्रग्जचा साठा बाहेर काढला. सध्या जप्त केलेले ड्रग्ज तपासासाठी पोरबंदरमधील एटीएसकडे सोपवण्यात आले आहेत. या बोटीचा पाकिस्तानशी संबंध असल्याचा संशय असून अधिक तपास सुरू आहे.

गेल्या वर्षी एप्रिल २०२४मध्येही आयसीजीने पोरबंदरजवळ ८६ किलो ड्रग्ज (६०० कोटी रुपये किमतीचे) जप्त केले होते, तर फेब्रुवारी २०२४मध्ये नौदल आणि एनसीबीने १३०० ते २००० कोटी रुपयांचे ३३०० किलो ड्रग्ज जप्त केले. त्यानंतर गस्त अधिक कडक करण्यात आली असून संशयास्पद हालचालींवर कडक लक्ष आहे.

## दिल्लीत भरणार हापूस आंबा महोत्सव



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीकरांना लवकर अस्सल देवगड आणि रत्नागिरी हापूस आंब्याची चव चाखायला मिळणार आहे. खासदार रवींद्र वायकर यांच्या संकल्पनेने दिल्लीत आंबा महोत्सव साजरा होणार आहे. या आंबा महोत्सवाच्या उद्घाटनास पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार असल्याची माहिती खासदार वायकर यांनी दिली.

दिल्ली येथील महाराष्ट्र सदनमध्ये ३० एप्रिल ते १ मे (महाराष्ट्र दिन)पर्यंत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामुळे ग्रामीण भागातील उद्योजकांना मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येणार आहे.

दिल्लीतील आंबा महोत्सवाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करावे यासाठी खासदार रवींद्र वायकर यांनी पंतप्रधानांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी पंतप्रधानांना आंबा महोत्सवाला येण्याचं अधिकृत निमंत्रण दिले. या महोत्सवाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांच्यासह देशाच्या विविध राज्यातील खासदार व आमदार यांनाही निमंत्रण देण्यात येणार असल्याचे खासदार वायकर यांनी सांगितले.

कोकणातील देवगड व रत्नागिरीतील हापूस आंबा महाराष्ट्रात व देशभरात प्रसिद्ध आहे. कोकणातील शेतकऱ्यांना विविध राज्यांमध्ये थेट बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यांना जास्तीत जास्त नफा मिळावा, आंब्याच्या निर्यातीला अधिक चालना मिळावी यासाठी आंबा महोत्सवाचे दिल्लीत आयोजन करण्यात आले आहे.

## पीएनबी घोटाळा करणाऱ्या मेहुल चोक्सीला अटक

### बेल्जियम पोलिसांची कारवाई

**ब्रुसेल्स : वृत्तसंस्था**

पंजाब नॅशनल बँकेत कोट्यवधींचा घोटाळा करणारा कर्जबुडव्या मेहुल चोक्सी याला बेल्जियम पोलिसांनी अटक केल्याची माहिती समोर आली आहे. चोक्सी हा हिरेव्यापारी कोट्यवधींचा कर्ज घोटाळा करून पळाला होता. त्याला सीबीआयच्या विनंतीवरून अटक करण्यात आली आहे.



मेहुल चोक्सी आणि त्याचा भाचा नीरव मोदी हे पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यात आरोपी आहेत. त्यांच्यावर १३ हजार ५०० कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. ईडी आणि सीबीआयने त्याला वॉँटेड जाहीर केले होते. बेल्जियम पोलिसांनी मेहुलला अटक केल्याने आता त्याच्या प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा झाला असल्याचे म्हटले जाते आहे.

पंजाब नॅशनल बँकेत हजारो कोटींचा घोटाळा २०१८मध्ये उघडकीस आला होता. मेहुल चोक्सी आणि नीरव मोदी यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून मोठी आर्थिक फसवणूक केली आहे. घोटाळा उघडकीस आल्यानंतर दोघे सोडून पळून गेले होते.

## एसटी बसेसमध्ये लागणार जीपीएस, सीसीटीव्ही कॅमेरे आणि पॅनिक बटन

**मुंबई : प्रतिनिधी**

महिलांच्या सुरक्षेसाठी राज्यात परिवहन महामंडळाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. स्वारगेट घटनेनंतर एसटीकडून सध्याच्या १२ हजार बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि जिपीएस बसवण्यात येणार आहे. याशिवाय एसटी महामंडळाने नव्या अडीच हजार गाड्यांमध्ये जीपीएस, पॅनिक बटण आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेतला आहे



एसटी महामंडळाकडे सध्या उपलब्ध असलेल्या १५ हजार बसेसपैकी तीन हजार बस पुढील वर्षभरात स्क्रॅपमध्ये जाणार आहेत. सुस्थितीतील असलेल्या १२ हजार बस टप्प्याटप्प्याने सेवेत दाखल होणार आहे आहेत. या बसेसमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेची अधिक काळजी घेण्यात येणार आहे. यासाठी एसटीच्या ताफ्यात दाखल होणाऱ्या बसेसमध्ये दोन महिन्यांत प्रत्येकी चार सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहे तसेच त्याचे मॉनिटरिंग गाडीतच असणार आहे. महामंडळाच्या सर्व बसेसना जीपीएस प्रणालीदेखील बसवली जाणार आहे. त्यामुळे बसेसचे नेमके लोकेशन समजायला मदत होणार आहे तसेचप्रवाशांना त्यांच्या प्रवासाचे नियोजन करण्यास मदत होणार आहे.

यासाठी केंद्र सरकारकडूनदेखील निधी मागण्यात आला असून मे महिन्यात निविदा प्रक्रिया राबवण्याचे नियोजन केले जात आहे. एसटी महामंडळाने याआधी १४ हजार बसेसमध्ये जीपीएस यंत्रणा बसवली होती, मात्र त्यातील सहा हजार गाड्यांमधील यंत्रणा निकामी झाली आहे. पडताळणी केल्यानंतर फक्त आठ हजार बसेसमधील जीपीएस यंत्रणा सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे आता सहा हजार बसगाड्यांमध्ये पुन्हा नव्याने जीपीएस मशिन बसवावे लागणार आहेत.

# महानगरांची वाढ, औद्योगिक क्षेत्रांमुळे अग्निशमन सेवेचे कार्य आव्हानात्मक -राज्यपाल

## ■ राज्यातील आठ अग्निशमन अधिकारी, जवानांना राष्ट्रपती पदक प्रदान




**मुंबई, : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेवाढती लोकसंख्या, महानगरांची उर्ध्व दिशेने होणारी वाढ तसेच वाढती औदयोगिक क्षेत्रे यामुळे आग व इतर आपत्तींना तोंड देणे आव्हानात्मक झाले आहे. रसायनांमुळे उद्भवणाऱ्या आगी, औद्योगिक अपघात, नैसर्गिक संकट तसेच अतिरेकी हल्ल्यांमुळे अग्निशमन दलापुढे नवनवी आव्हाने ठाकत आहेत. या परिस्थितीत अग्निशमन सेवा दलापुढे पायाभूत सेवा-सुविधांचे रक्षण करणे, सार्वजनिक ठिकाणांची सुरक्षा जपणे व औद्योगिक संपदेचे संरक्षण करणे ही महत्वाची जबाबदारी आली आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त राज्यस्तरीय अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.मुंबई अग्निशमन दलातील तसेच राज्याच्या इतर महानगर पालिका येथील ८ अग्निशमन अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी राज्यपालांच्या हस्ते गुणवत्तापूर्ण अग्निशमन सेवेकरिता जाहीर झालेले राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले.

अग्निशमन कार्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तसेच ड्रोनचा वापर वाढविण्याबाबत अग्निशमन विभागाने गांभीर्याने विचार केला पाहिजे असे सांगताना दलाने अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निरंतर कौशल्य वर्धन व प्रशिक्षण केले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. .मुंबईसारख्या महानगरांमध्ये गृहनिर्माण संस्थांना अग्नी सुरक्षे संबंधी जनजागृती कार्यात सहभागी करून घेतले पाहिजे तसेच गृहनिर्माण संस्था व औद्योगिक आस्थापनांचे नियमित फायर ऑडिट झाले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

अग्निशमन या विषयाचे सर्वंकष अध्ययन करण्यासाठी एक संशोधन संस्था निर्माण केली पाहिजे, अग्निशमन कार्यात नवनवे तंत्रज्ञान वापरले पाहिजे तसेच अग्निशमन कार्यासाठी पर्यावरण स्नेही अग्निरोधक विकसित केले पाहिजे असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.अग्निशमन कार्यात सेवानिवृत्त अग्निशमन अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा उपयोग केला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

महाविद्यालये तसेच विद्यापीठांमध्ये युवकांसाठी कमी मुदतीचे अग्निशमन अभ्यासक्रम सुरु केले पाहिजे असे राज्यातील २९ सार्वजनिक विद्यापीठांचा कुलपती या नात्याने आपणास वाटते असे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी राज्यपालांनी मुंबई अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी रवींद्र अंबुलगेकर, मुंबई अग्निशमन दलाचे उपमुख्य अग्निशमन अधिकारी दीपक घोष, सब ऑफिसर सुनिल गायकवाड, लिडींग फायरमन पराग दळवी, फायरमन तातु परब, पुणे महानगरपालिकेतील फायर इंजिन वाहनचालक करीमखान पठाण, सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेतील फायरमन कसप्पा लक्ष्मण माने व पुणे महानगरपालिकेतील फायर अटेंडण्ट नरसिंहा पटेल यांना राष्ट्रपति पदक प्रदान केले.

या वेळी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालक संतोष वारिक यांनी राज्यपालांच्या पोशाखाला अग्निशमन ध्वजाचे तिकीट लावले. राज्यपालांनी अग्निशमन सेवा कर्मचारी कल्याण निधीला आपले योगदान दिले तसेच जनतेला निधीसाठी अधिकाधिक योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला मुंबई अग्निशमन दलाचे, औद्योगिक आस्थापनांचे तसेच महाराष्ट्र अग्निशमन सेवेतील वरिष्ठ अग्निशमन अधिकारी उपस्थित होते.मुंबई डॉकयार्ड येथे सन १९४४ साली झालेल्या जहाजावरील स्फोटात प्राण गमावलेल्या अग्निशमन अधिकारी व जवानांच्या स्मरणार्थ १४ एप्रिल हा दिवस राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिवस पाळला जातो तसेच या दिवसापासून अग्निशमन सप्ताह पाळल्या जातो.

# माजी आमदार पंडित पाटील यांच्यासमवेत अनेक कार्यकर्ते करणार भाजपत प्रवेश -यादव

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड व रोहा तालुक्यातील प्रमुख शेकडो कार्यकर्ते येत्या १६ एप्रिल रोजी माजी आमदार पंडितशेठ पाटील व आस्वाद पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मुंबई येथील भारतीय जनता पार्टीच्या मुख्य कार्यालयात भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर पक्ष प्रवेश करणार असल्याची माहिती शेकाप रोहा तालुका युवक पुरोगामी अध्यक्ष नंदेश यादव यांनी दिली आहे.

भारतीय जनता पार्टी मध्ये पक्ष प्रवेश करणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांची मुरुड शीघ्रे येथील माजी आमदार पंडितशेठ पाटील यांच्या बंगल्यावर एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ते पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होते.या वेळी यादव यांनी सांगितले की,मुंबई मधील हा प्रमुख कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश झाल्यानंतर रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात पक्ष प्रवेश कार्यक्रम सपन्न होणार आहे.माजी आमदार पंडितशेठ पाटील याना संघटनात्मक जबाबदारी मिळाल्यास जास्तीत जास्त पक्ष वाढवण्यास ते निश्चित मदत करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

मुंबई येथील पक्ष प्रवेश कार्यक्रमात आमदार पंडितशेठ पाटील यांचे समर्थक धर्मा हिरवे,विजय म्हात्रे,रमेश दिवेकर, एम एम ठाकूर,सावली ग्रामपंचायत सरपंच राजेश कृष्ण कर्जेकर, धर्मा पोटदुखे, सुरेश दिवेकर. भरत महादान,राजेश दिवेकर,राजेंद्र म्हात्रे,रोहा तालुका पुरोगामी युवक अध्यक्ष नंदेश यादव, प्रकाश भोस्तेकर,भाऊ डिके हे पक्ष प्रवेश करणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी नंदेश यादव यांनी सांगितले कि, पंढरपूर अधिवेशनात माजी आमदार पंडितशेठ पाटील यांना सन्मानाची वागणूक दिली गेली नाही.येथूनच वादाची ठिणगी पडली, तदनंतर विधानसभा निवडणुकीत माजी आमदार पाटील याना संधी न देता डावलण्यात आले.वेळोवेळी सांगून सुद्धा दुर्लक्ष करून कुचंबणा करण्यात आली.आस्वाद पाटील जिल्हा चिटणीस असून मीटिंग लावू शकत नाही.स्वतःच्या सुनेला आमदार बनवण्यासाठी सतत त्यांना सुद्धा डावलण्यात आले आहे.

भारतीय जनता पार्टी ने ज्या प्रमाणे खासदार धर्यशील पाटील यांचा सन्मान केला त्या प्रमाणे माजी आमदार पाटील व आस्वाद पाटील यांचा सुधा सन्मान भारतीय जनता पार्टी मध्ये राखला जाणार असल्याचा विश्वास यादव यांनी व्यक्त केला आहे.पक्षाच्या दुर्लक्षामुळे व कार्यकर्त्याच्या आग्रहास्तव हा पक्ष प्रवेश होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



# समीर शेडगे यांची समर्थकांसह राष्ट्रवादीत घरवापसी

## मंत्री, खासदार, आमदारांची उपस्थिती; रोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्याध्यक्षपदी शेडगेंची नियुक्ती

**रोहे,धाटाव : प्रतिनिधी**

रोह्याचे माजी नगराध्यक्ष तथा शिवसेनेचे भूतपूर्व तालुका प्रमुख समीर शेडगे यांनी त्यांचे शेकडो समर्थक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रविवारी सायंकाळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी मोठ्या संख्येने रोहेकरांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली होती. या पक्ष प्रवेशाने राष्ट्रवादी पक्षाला नवीन ऊर्जा मिळणार असून आपण सर्वदूर बांधिलकी घेऊन रोह्याच्या विकासासाठी एकत्रपणे काम करू असे प्रतिपादन राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांनी रोहा येथे पक्षप्रवेश सोहळ्यात केले.

यावेळी बोलतांना खासदार तटकरे यांनी समीर तू आणि तुझ्या असंख्य सहकार्याने पुन्हा एकदा सोबत येत उद्याच्या भवितव्यासाठी आम्ही सगळे एक आहोत उद्याच्या रोहाचे भवितव्य घडवण्याचा काम आपण सगळेजण सामुदायाकरिता निश्चितपणाने करू या. मनामध्ये नवीन संकल्पना घेऊन त्यासाठी झपाट्याने काम करू या. योग्य वेळेला तू आणि तुझ्या सर्व सहकार्य निर्णय घेत अजितदादांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जो प्रवेश केलात माझे सगळे पदाधिकारी तालुक्यातील माझे सर्व ज्येष्ठ सहकारी यांच्या सहकार्यातून आणि प्रदेशाध्यक्ष



म्हणून रोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्याध्यक्षपदी तुझी निवड या ठिकाणी मी घोषित करतो, असे सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षात उबाठा तालुका अध्यक्ष समिर शेडगे, उपतालुकाप्रमुख महादेव साळवी, महिला संघटीका निता हजारे, माजी नगरसेविका समिक्षा बामणे, कामगार सेना संघटक हर्षद साळवी, उपशहर प्रमुख आदित्य कोंडाळकर, बिलाल मोर्बेकर, अमित कासाट, सुवर्ण देसाई, सिध्देश शेडगे, इरफान दर्जी, मजहर सिध्दीकी, अल्ताफ नुराजी, स्नेहल साळवी, सय्यद येरुणकर, मिलनाथ नाईक, चंद्रकांत कारभारी सह रोहा शहर व तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते यांनी प्रवेश केला आहे.

यावेळी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी आमदर अनिकेत तटकरे, प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा अध्यक्ष मधुकर पाटील, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, नंदकुमार म्हात्रे, तालुका अध्यक्ष विनोद पाशीलकर, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, रत्नप्रभा काफरे, महीला तालुका अध्यक्ष प्रितम पाटील, शहर अध्यक्ष अमित उकडे, दिपीका चिपळूणकर, महीला शहर अध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, गट नेते महेंद्र गुजर, महमदशेठ डबीर, अहमद दर्जी, अप्पा देशमुख, चंद्रकांत पार्टे आदी मान्यवर उपस्थित होते.

समिर शेडगे यांनी रोहा तालुक्याच्या विकासासाठी या भावनेने पक्षात आज आलो आहे. राष्ट्रवादी पक्षाला अधिक उभारी देईन.रोहेकरांच्या अडीअडचणी वेळी धावल्याने रोहेकरांनी माझ्यावर प्रेम केले आहे.कोणतीही अट न घालता फक्त सुनील तटकरे, आदिती तटकरे व अनिकेत तटकरे यांच्या विश्वास ठेवुन पक्ष प्रवेश केला आहे.

पक्ष प्रवेशाच्या आधी समिर शेडगे यांनी शक्ती प्रदर्शन करीत ढोल ताशावर मिरवणुक काढून आपली ताकत दाखवली. पक्ष प्रवेश कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिक राक्षे यांनी केले.अभार अमित उकडे यांनी मानले.

पान १ वरुन

## पनवेलमध्ये मिरवणुकीसह विविध उपक्रमांनी डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, नितीन पाटील, राजू सोनी, माजी नगरसेविका राजेश्री वावेकर, दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवदास कांबळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, पालिकेचे अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

यानंतर भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित तीन चित्ररथ तयार करण्यात आले होते. मिरवणुकीचा समारोप डॉ. आंबेडकर भवनाजवळ करण्यात आला. त्यानंतर पुढील कार्यक्रम भवनात झाला.

या वेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली लोकशाही आणि राज्यघटना जपण्यास पनवेल महापालिका सज्ज आहे व याचा सर्वांना अभिमान आहे, असे सांगून महापालिका व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीने आयोजित केलेल्या मिरवणुकीचे व विविध स्पर्धांचे विशेष कौतुक केले.

डॉ. आंबेडकर भवनात झालेल्या कार्यक्रमास विधान परिषद आमदार विक्रांत पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक-नगरसेविका, महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी, शिक्षक, विविध संस्थांचे सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी समारोप करून आभार मानले.

***संविधान उद्देशिकेचे अनावरण, भवनाच्या सौंदर्यीकरण कामांचे भूमिपूजन***

*पनवेल महापालिका मुख्यालयात संगमरवरी दगडावर कोरलेल्या संविधान उद्देशिकेचे अनावरण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. त्याचप्रमाणे महापालिकेच्या प्रभाग समिती ३ अंतर्गत प्रभाग क्र. १९मधील भू.क्र. ३१८ येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्यात आले आहे. या भवनाच्या बाह्य व अंतर्गत सौंदर्यीकरणासह इतर अनुषंगिक कामांचे भूमिपूजन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या आंबेडकर भवनात महापालिकेतर्फे ग्रंथालय चालवले जाते. दरम्यान, हे भवन सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उपयुक्त ठरेल तसेच स्थानिक नागरिकांसाठी एक महत्त्वाचे केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केला.*



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**मुंबई : प्रतिनिधी**

येथील महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

महापारेषणचे संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. याप्रसंगी संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे, मुख्य अभियंता जुईली वाघ, . सुनील सूर्यवंशी, . भूषण बल्लाळ, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) मंगेश शिंदे, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) नितीन कांबळे, अभय रोही, उपमुख्य दक्षता अधिकारी किशोर पाटील, ी. प्रशांत गोरडे, राजशिष्टाचार अधिकारी. सतिश जाधव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी मान्यवरांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौलिक विचार



सांगितले. कार्यालयात संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. काही अधिकाऱ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकांचे वाचन केले. तर काही कर्मचाऱ्यांनी भीमगीते गाऊन अनोख्या पध्दतीने जयंती साजरी केली

# सागर विहारमधील खारफुटीची स्वच्छता

## माजी खासदार संजीव नाईक यांची उपस्थिती

**नवी मुंबई : बातमीदार**

खारफुटी संवर्धनात आग्रहीपणे काम करणाऱ्या मॅन्ग्रोव्ह मार्शल या संस्थेच्या वतीने शनिवारी वाशीच्या सागर विहार परिसरातील क्लीनअप अभियान राबविले. यंदा या मोहिमेचा २०० वा भाग होता. आजतागायत जवळपास ३३० ट्रक कचरा गोळा करण्यात पर्यावरण प्रेमींना यश आले आहे.माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी या अभियानात सहभाग घेऊन श्रमदान केले. याप्रसंगी पर्यावरणप्रेमी रोहित मल्होत्रा, समाजसेवक विजय वाळूज, महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवी मुंबई, पनवेल, उरण भागात खारफुटी संवर्धनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विकासाच्या आड कांदळवनाचा बळी घेतला जात आहे. त्यामुळे शहरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उभा ठाकला आहे. कांवडळवने नष्ट झाल्यास २६ जुलै सारखा प्रलय भविष्यात आल्यास पाणी शहरात शिरण्याची शक्यता आहे. याबाबत पर्यावरण प्रेमी सातत्याने जनजागृती करत आहेत. शासनाच्या माध्यमातून खारफुटी संवर्धनासाठी अनेक उपाययोजना आखल्या जात आहेत. त्याअंतर्गत विविध पर्यावरणवादी संघटना काम करीत आहेत. विशेषतः खारफुटी परिसराची स्वच्छता ही मोठी जोखीम ठरली आहे. मात्र, मॅन्ग्रोव्ह मार्शल या संस्थेने ही जोखीम पत्करली आहे.



### *गेली सात वर्ष स्वच्छता अभियान*

***शनिवारी सागर विहार परिसरातील खारफुटी क्षेत्रात हे अभियान राबविण्यात आले होते. गेली सात वर्ष हे अभियान राबविले जात आहे. डॉ. संजीव नाईक यांनी या अभियानात सहभाग घेऊन श्रमदान केले. खारफुटीचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. सामाजिक जबाबदारी समजून यात प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. तसेच मॅन्ग्रोव्ह क्लीनअप मार्शलच्या उपक्रमाची प्रशंसा केली.***

# कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांचा खारघरमध्ये जाहीर सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील केंद्रीय विहार या हाऊसिंग सोसायटीच्या वतीने पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जाहीर सत्कार सोहळ्याचे आयोजन रविवारी (दि. १३) करण्यात आलं होतं.

गेली २० वर्ष पासूनचा केंद्रीय विहार सोसायटीचा प्रश्न निकाली काढण्यात आमदार प्रशांत ठाकूर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सिडकोच्या वतीने त्यांना सर्विस चार्ज म्हणून ५ कोटी १४ लाख इतका भरावा लागणार होता परंतु आमदार प्रशांत ठाकूर यांच्या महत्त्वाच्या भूमिकेमुळे सोसायटीच्या सर्विसची रक्कम २ कोटी ८० लाख झाली आहे. आपल्या सुखदुःखात आमदार प्रशांत ठाकूर हे नेहमीच धावून येत असतात. खारघर येथील केंद्रीय विहारचा हा विषय सोसायटी धील सदस्यांनीसाठी जिव्हाळ्याचा झाला होता. यामधून आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे केंद्रीय विहार सोसायटीला मोठा दिलासा मिळाला आहे.



आमदारांनी केलेल्या कामाचं कौतुक म्हणून रविवारी सोसायटीच्या वतीने जाहीर सत्कार सोहळ्याचा आयोजन करण्यात आलं होतं. या सत्कार सोहळ्याला केंद्रीय विहार फेडरेशनचे अध्यक्ष डी एन पौनीकर, फेडरेशनचे सचिवांनी सुनील कुमार साहू, कोषाध्यक्ष दिपू कुमार,सदस्य चित्रा राव, भारतीय जनता पार्टीचे खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, किरण पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## खारघरमधील कावेरी सोसायटीच्या संरक्षण भिंतीचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील कावेरी सोसायटीच्या संरक्षण भिंतीचे भूमिपूजन पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. १३) झाले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक संकल्प केला आहे सबका साथ सबका विकास या तत्त्वावर चालण्याचा प्रयतक भारतीय जनता पार्टी सातत्याने करतीये. महाराष्ट्र सरकार, पनवेल महापालिकेकडे सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांकडून विविध विकासकामे इथं होत आहेत. पनवेल महापालिका आणि सिडको यांच्याकडून आपल्याला जास्तीत जास्त चांगल्या सुविधा मिळवण्यासाठी आम्ही नक्कीच प्रयतक करू असे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर येथील या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी केले.

या भूमिपूजन सोहळयाला पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भारतीय जनता पार्टी खारघर शहराचे अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, अमर उपाध्याय यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



## पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे अग्निशमन सेवा सप्ताह

### जनजागृतीसाठी विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे दिनांक १४ एप्रिल पासून अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते आज कळंबोली येथील अग्निशमन केंद्रात करण्यात आले.



उद्घाटनप्रसंगी उपायुक्त कैलास गावडे, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अग्निशमन अधिकारी हरिदास सुर्यवंशी, उप अग्निशमन अधिकारी संदीप पाटील तसेच महापालिकेतील महिला व पुरुष अग्निशमन कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी आयुक्त मंगेश चितळे यांनी शहीद अग्निशमन जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. या सप्ताहाच्या दरम्यान नागरिकांमध्ये आग आणि आपत्ती व्यवस्थापनासंदर्भातील जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच, निवासी, व्यापारी, शैक्षणिक इमारती व गृह निर्माण संस्थांमध्ये अग्निसुरक्षेबाबत मार्गदर्शन, ड्रील्स आणि प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. या सप्ताहाचा समारोप २० एप्रिल रोजी मुंबई येथे मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.



**पनवेल : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भाजपच्या तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात साजरी करण्यात आली. या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन केले.**

## परिणीता महिला सन्मान पुरस्कार

**पनवेल :** परिणीता सोशल फाउंडेशनचा महिला सन्मान पुरस्कार सोहळा मंगळवारी (दि. १५) दुपारी ४ ते ७ या वेळेत पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होत आहे. या सभारंभास सिने कलाकारांसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



**पनवेल : नवीन पनवेल येथील मोहटादेवी (रेणुकामाता) मंदिरात प्राणप्रतिष्ठापना सोहळा सोमवारी झाला. आमदार प्रशांत ठाकूर यांनी तेथे भेट दिली. ट्रस्टचे अध्यक्ष संतोष आमले यांनी त्यांचे स्वागत केले. सोबत बबन बारगजे व अन्य.**

## तक्का येथील रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्या वाढदिवसानिमित्त कच्छ युवक संघ पनवेल, ग्रामस्थ मंडळ आणि युवा प्रतिष्ठान तक्का तसेच अजय बहिरा मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ४७व्या अँकरवाला रक्तदान अभियान अंतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन रविवारी (दि. १३) करण्यात आले होते. हे तक्का मराठी शाळा येथे झाले.



या शिबिराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांच्या हस्ते रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

शिबिरास भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप सरचिटणीस भाई पाटील, कामोठे मंडळ अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेटकर, माजी नगरसेवक अजय बहिरा, युवा मोर्चा तक्का विभागीय अध्यक्ष प्रतीक बहिरा, तक्का प्रभाग समिती अध्यक्ष रघुनाथ बहिरा, प्रभाकर बहिरा, संदीप बहिरा, तुकाराम बहिरा, भानूदास बहिरा, महेश राऊळ, राम सारंग, गोपाल करटगी, संतोष आपशिंगे, महेंद्र सिंह, चेतन शहा, प्रशांत बहिरा, आमरीक सिंग, अतुल बहिरा, रूपेश परदेशी, भारत बहिरा, श्रेयस बहिरा, सचिन चिखलेकर राहुल वाहूळकर, लोकेश ठाकूर, आफताब ताडे, इस्माईल भाई, समद मुकादम, अभिजित भवर, अंकुश पाटील मयुर कदम, एमजीएम हॉस्पिटलचे डॉ. राजेश भाई आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. शिबिराला रक्तदात्यांचा प्रतिसाद लाभला.

## पनवेल तालुक्याचा संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडा

**पनवेल : वार्ताहर**

एप्रिलमध्ये उन्हाळ्याची आता अधिक कडक झळ बसू लागली आहे. त्यामुळे पनवेल तालुक्यात पाणीटंचाई जाणवू लागली आहे. म्हणूनच पनवेल पंचायत समितीने संभाव्य पाणीटंचाई कृती तयार केला असून ५४ गाव-वाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव बनवला आहे. यासाठी ९१ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

पनवेल तालुक्यातील शिरढोण, कसळखंड, आपटा, वारदोली, मालढुंगे, वाजे, खैरवाडी, नानोशी, पाले बुद्रुक, नांदगाव, गुळसुंदे, वांगणी तर्फे वाजे, बारवई या ग्रामपंचायत हद्दीतील गाववाड्यांवर पाणीपुरवठा करण्यासाठी प्रस्ताव बनवण्यात आला. तर ४४ गाववाड्यांसाठी विंधण विहिरींचा प्रस्ताव बनवण्यात आला असून त्यासाठी ४९ लाखांचा खर्च अपेक्षित आहे. यापैकी शिरढोण, कसळखंड, वारदोली, मालढुंगे, खैरवाडी, सोमटणे, पोयंजे, खानाव, गुळसुंदे, नांदगाव, वांगणी तर्फे वाजे, नानोशी, शिरवली, नेरे, वलप, वाकडी, भाताण, उसर्ली खुर्द या ग्रामपंचायत हद्दीमध्ये विंधण विहिरींसाठीचा प्रस्ताव बनवण्यात आला आहे.

ठिकठिकाणी पाणीटंचाई जाणवू लागली आहे. पंचायत समितीच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून पनवेल तालुक्यातील संभाव्य टंचाईग्रस्त गावांच्या यादीसोबतच या टंचाईवर मात करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे. पाणीटंचाई आणखी तीव्र होण्यापूर्वी गाववाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करावा आणि विंधण विहिरी मंजूर करून त्या खोदण्याची मागणी केली जात आहे.



**पनवेल : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कळंबोली पक्ष कार्यालयात साजरी करण्यात आली.**

## कामोठ्यातील तरुणीची भामट्याकडून फसवणूक

**पनवेल: वार्ताहर**

लग्नाचे स्वप्न दाखवत घाटकोपरच्या निखिल दळवीने आत्महत्या करीत असल्याचे भावनिक नाट्य वठवत तरुणीला साडेचार लाखाला गंडा घातला आहे.

कामोठे येथील भगत हेरिटेजमध्ये राहणार्या एका तरुणीची निखिल दीपक दळवी (चिरागनगर घाटकोपर, मुंबई) याची शादी डॉट कॉम आणि संगम मॅट्रिमोनी वेबसाईटवर ओळख झाली. ओळखीचे मैत्रीत रूपांतर झाले. निखिलने तिला भावनिक जाळ्यात अडकवून एके दिवशी आर्थिक अडचणीत असल्याने आत्महत्या करीत असल्याची बतावणी केली. त्यानंतर तिच्याकडून दोन वेळा एकूण साडेचार लाखाची रक्कम उकळली. त्याचे बोगस बँक स्टेटमेंट, पोचपावती तिला दिली. याशिवाय आरोपी निखिल दळवीने गुगलमध्ये कामाला असल्याचा चकवा देत तिला फसविल्याने तरुणीने कामोठे पोलिस ठाण्यात निखिलविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

फियांदीच्या तक्रारीवरून सहाय्यक पोलिस निरीक्षक राकेश पगारे यांनी गुन्हा नोंदविला आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक विमल बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रशांत तायडे यांच्याकडे प्राथमिक तपास सोपविला आहे.

## कामावर गेलेला इसम बेपत्ता

**पनवेल :** कामावर गेलेला एक इसम अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. भगवान मारुती आवळे (३८ रा.नावडे कॉलनी) असे या इसमाचे नाव असून उंची ५ फुट २ इंच, मध्यम बांधा, रंग सावळा, केस काळे सफेद, नाक बसके, चेहरा गोल, नाकास उजव्या बाजूस तीळ आहे. अंगात आकाशी रंगाचा फुल शर्ट व चॉकलेटी रंगाची जिन्स पॅन्ट, पायात काळ्या व लाल रंगाची चप्पल घातलेली आहे. सोबत मोबाईल फोन आहे.



त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे ०२२-२७४१२३३३ किंवा पो.हवा.गणपत पवार ९९६७२८२०७५ येथे संपर्क साधावा.



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत माऊली हरीपाठ मंडळ गव्हाण-कोपर आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास भजनसम्राट हभप निवृत्तीबुवा चौधरी यांनी भेट दिली. सोबत कृष्णाबुवा पवार होते. माजी उपसरपंच विजय घरत यांनी निवृत्तीबुवा व कृष्णाबुवा पवार यांचा सन्मान केला. या वेळी मंदिर कमिटीचे अध्यक्ष अशोक कडू, शेलघर अध्यक्ष अमृत भगत, सुहास भगत, हभप वसंत पाटील, हभप विलास म्हात्रे व नितीन गुरुजी उपस्थित होते.**

## महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेने केला खांदेश्वर पोलिसांचा सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आणि महाराष्ट्र शासन गृह विभाग पोलिस निराकरण समन्वय समिती सदस्य राहुल भैय्या दुबाळे यांच्या सूचने प्रमाणे आणि रायगड जिल्हा अध्यक्ष किशोर भाऊ वाजे यांच्या मार्गदर्शनाखाली कु. करण बाळासाहेब पवार पनवेल तालुका अध्यक्ष यांच्या पुढाकाराने आज महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना पनवेल तालुका टीमने खांदेश्वर पोलीस स्टेशन मधील पोलीस बांधवांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार केला.

यावेळी सौ. स्मिता ढाकणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खांदेश्वर पोलीस स्टेशन आणि बळवंत पाटील सहाय्यक पोलिस निरीक्षक,खांदेश्वर पोलीस स्टेशन देखील उपस्थित होते. येत्या काही दिवसातच महापुरुषांची जयंती असल्यामुळे कामाचा ताण असताना देखील वपोनि स्मिता ढाकणे यांनी या संघटनेचे कार्य समजून घेतले आणि सदर संघटना करत असलेल्या कार्याबद्दल आणि पुढील वाटचाली साठी खूप शुभेच्छा दिल्या. यावेळी रायगड जिल्हाध्यक्ष किशोर वाजे, उपसचिव रायगड जिल्हा सुजित जाधव, पनवेल तालुकाध्यक्ष करण पवार, रायगड जिल्हा आरोग्य सेवक उपाध्यक्ष प्रसन्न पडवळे, रायगड जिल्हा पोलीस भरती प्रमुख सहाय्यक प्रणिल पाटील, रायगड जिल्हा महिला सोशल मिडीया प्रमुख मंचिता मोरे, सदस्य बाळासाहेब पवार, ओमकार शेरखाने उपस्थित होते.



## संपादकीय

# काँग्रेसवर बोचरी टीका

मुस्लिम धर्मियांचे लांगुलचालन करण्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस पक्षाला सोमवारी चांगलेच धारेवर धरले. हरियाणातील हिसार येथे बोलताना मोदींनी काँग्रेसचा मुस्लिमांविषयीचा कळवळा किती दांभिक आहे यावर नेमके बोट ठेवले.

**हरियाणातील हिसार येथील विमानतळावरून अयोध्येसाठीच्या थेट विमानसेवेचा शुभारंभ करण्यासोबतच नव्या टर्मिनलच्या इमारतीची पायाभरणीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आली. यावेळी संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा उल्लेख करीत हा दिवस संपूर्ण देशासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे असे मोदी म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिलेल्या वागणुकीबद्दल त्यांनी काँग्रेस पक्षावर टीका केली. काँग्रेस पक्षाने दोनदा बाबासाहेबांचा निवडणुकीतील पराभव घडवून आणला, तसेच त्यांच्या निधनानंतर त्यांचा वारसा पुसून टाकण्याचा प्रयत्न केला. बाबासाहेबांना देशात समानता आणायची होती तर काँग्रेस पक्षाने देशात व्होटबँकेचे राजकारण पसरवले. जेव्हा जेव्हा काँग्रेस पक्षाला आपली सत्ता संकटात असल्याचे दिसले, तेव्हा तेव्हा त्यांनी संविधान पायदळी तुडवले. आणीबाणीच्या काळात तर काँग्रेसने संविधानाच्या आत्म्यालाच नख लावले. आणि आता काँग्रेस पक्षाने संविधानाला सत्ता मिळवण्याचे साधन बनवले आहे. संविधानाच्या तत्त्वांशी सुसंगत असूनही उत्तराखंडमध्ये काँग्रेस पक्षाकडून समान नागरी संहिता लागू करण्याला विरोध होत आहे. संविधानात अनुसूचित जातीजमाती आणि इतर मागासवर्गीय समुदायांसाठी आरक्षणाची तरतूद होती. धर्माच्या आधारावर आरक्षणाला स्थान नसावे असे बाबासाहेबांनी संविधानात म्हटले होते. पण कर्नाटकातील काँग्रेस सरकारने धर्माच्या आधारावर आरक्षण दिले. काँग्रेसने केलेल्या लांगुलचालनामुळे मुस्लिमांचाही कोणताही लाभ झाला नाही. त्या धर्मातील बहुसंख्य लोक अशिक्षित व गरीब राहिले आहेत, असे सांगत, कायम मुस्लिमांच्या लांगुलचालनाचे राजकारण करणारा काँग्रेस पक्ष आपल्या राष्ट्रीय अध्यक्षपदी एखाद्या मुस्लिम व्यक्तीला का नेमत नाही असा बोचरा प्रश्न पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसला विचारला आहे. भाजपवर टीका करणे एवढाच कार्यक्रम राबवणाऱ्या काँग्रेसला पंतप्रधानांचा हा सवाल निश्चितच झोंबेल. अखिल भारतीय काँग्रेस समितीचे दोन दिवसांचे अधिवेशन नुकतेच गुजरातमधील अहमदाबाद येथे पार पडले. ज्या राज्यात गेल्या ३० वर्षांत काँग्रेसला सत्तेच्या जवळपासही फिरकता आलेले नाही, जिथे ताज्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा कसाबसा एक खासदार निवडून आला त्या गुजरातमध्ये पक्षाचे अधिवेशन आयोजित करण्याची हिंमत काँग्रेस पक्षाने दाखवली खरी, पण या अधिवेशनाने काँग्रेस पक्षात किंवा त्या पक्षासंदर्भातील एकंदर परिस्थितीत किंचितसेही काही बदलेल अशी अपेक्षा तूर्तास तरी कुणालाही नसावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या निमित्तानेही भाजपवर टीका करण्याची संधी काँग्रेस नेत्यांनी सोडली नाहीच. पंतप्रधानांनी केलेल्या टीकेला केविलवाणे प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न तेवढा त्यात दिसला. हिसार ते अयोध्या धाम विमानसेवेचा शुभारंभ सोमवारी पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी श्रीकृष्णाची पावनभूमी हरियाणा ही श्रीरामप्रभूंच्या भूमीशी अयोध्येशी थेट जोडली गेल्याबद्दल पंतप्रधानांनी आनंद व्यक्त केला. २०१४ पूर्वी भारतात ७४ विमानतळ होते तर आज देशातील विमानतळांची संख्या १५० पेक्षा जास्त आहे. गेल्या दहा वर्षांत लाखो भारतीयांनी जीवनात पहिल्यांदाच विमानाने प्रवास केला आहे. चप्पल घालणारे लोकही हवाई प्रवास करू शकतील हे वचन आपण जनतेला दिले आहे याचाही मोदींनी यावेळी पुनरुच्चार केला. हिसार विमानतळामुळे हरियाणाच्या तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी आणि स्वप्ने प्राप्त होतील असेही मोदी यावेळी म्हणाले.**

# संत साहित्याचे अभ्यासक डॉ. वि.रा. करंदीकर

संत साहित्याचे अभ्यासक विनायक करंदीकर यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म कोल्हापूर येथे २७ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. मिरज येथील १९३५मध्ये ते मॅट्रिक झाले. विलिंग्डन महाविद्यालयातून १९४७ साली मराठी हा विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची बीएची परीक्षा ते प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. १९५० साली मराठी व संस्कृत या विषयांत पहिल्या वर्गात प्रथम क्रमांक व सर्व पारितोषिके मिळवून पुणे विद्यापीठाची एमए ही पदवी त्यांनी संपादन केली. वामन पंडितांच्या 'यथार्थदीपिका' या ग्रंथाचा एक गीताभाष्य या दृष्टीने चिकित्सक अभ्यास करून १९५७ साली पुणे विद्यापीठाची पीएचडी ही पदवी त्यांनी मिळवली.

विलिंग्डन महाविद्यालय, सांगली व फर्गसन महाविद्यालय, पुणे येथे मराठीचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून करंदीकर यांनी काम पाहिले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य या नात्याने सोसायटीचे सचिव म्हणून काम करताना त्यांनी आपल्या कार्यक्षमतेचा व निःपक्षपाती कार्यपद्धतीचा ठसा उमटविला. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने सिद्ध व्हावयाच्या मराठी शब्दकोशाचे प्रमुख संपादक या पदावर ते चार वर्षे कार्यरत होते. १९८८ मध्ये पुणे विद्यापीठात स्थापन झालेल्या ज्ञानदेव अध्यासनाचे प्राध्यापक म्हणून त्यांना निमंत्रित करण्यात आले. सुमारे साडेतीन वर्षे त्यांनी ते काम केले.

'वामन पंडितांची यथार्थदीपिका' (१९६३), 'भगवद्गीतेचे तीन टीकाकार' (१९७४), 'ग्रंथवेध' (१९७८), 'रामकृष्ण संघः एक शतकाची वाटचाल' (१९८९), 'ज्ञानेश्वरी दर्शन' (१९९२), 'वेध ऋणानुबंधांचा' (१९९३), 'ज्ञानदेवांचा गीतासंवाद' (१९९४), 'ज्ञानदेव : विवेकानंद' (१९९६), 'तीन सरसंघचालक' (१९९९), 'विश्वमानव स्वामी विवेकानंद खण्ड एक ते तीन' (२००१), 'रामकृष्ण विवेकानंद आणि गुरुबंधू' (२००२), 'ख्रिस्त, बुद्ध आणि श्रीकृष्ण' (२००८), हे करंदीकर यांचे ग्रंथलेखन आहे. 'समर्थ रामदास विवेकदर्शन' हे रामदासांच्या निवडक साहित्याचे साहित्य अकादेमीसाठी त्यांनी संपादन केले. यांखेरीज आकाशवाणीवरुन ज्ञानेश्वर, एकनाथ व रामदास यांच्या साहित्यातील निवडक वेचांचे विवरण करणारे भाष्य त्यांनी अन्यांच्या सहकार्याने सिद्ध केले. त्यामधून 'एक तरी ओवी ज्ञानेशांची' (हे. वि. इनामदार यांच्या सहकार्याने १९९२), 'साक्षेप समर्थांचा' (कल्याणी नामजोशी यांच्या सहकार्याने १९९४), 'एका जनार्दनी' (कल्याणी नामजोशी यांच्या सहकार्याने १९९७) अशी तीन पुस्तके तयार झाली. त्यांच्या 'रामकृष्ण आणि विवेकानंद', 'रामकृष्ण संघ : एक शतकाची वाटचाल' व 'तीन सरसंघचालक' या ग्रंथाची इंग्रजीत भाषांतरे अनुक्रमे म. द. हातकणंगलेकर (१९९१), पी. एस. सबनीस (२००३) यांनी केली आणि 'समर्थ रामदास' या पुस्तकाचे कन्नडमध्ये भाषांतर झाले आहे. दे. द. वाडेकर संपादित 'मराठी तत्त्वज्ञान कोश', रा. श्री. जोग संपादित 'मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ३' आणि 'मराठी विश्वकोश' या ग्रंथात करन्दीकरांनी मराठी वाङ्मय, तत्त्वज्ञान आणि भाष्यग्रंथ यांवर विस्तृत स्वरुपाचे लेख लिहिले आहेत. त्यांचे 'विदेश संचार आणि मुक्त चिंतन' (१९९८) हे प्रवासवर्ण इंग्लंड व अमेरिका या देशांत घडलेल्या प्रवासावर आधारित आहे. 'कुणा यात्रिकाचा जीवनसंवाद' (२००३) हे करंदीकर यांचे साडेसहाशे पृष्ठांचे आत्मचरित्र त्यांच्या आयुष्यातील बहुतेक सर्व महत्त्वाच्या प्रसंगांची हकीकत विस्ताराने नोंदवते. ही नोंदकरंदीकरांचा स्वतःकडे व त्यांच्या आयुष्यात आलेल्या संबंधित इतरेजनांकडे पाहाण्याच्या दृष्टीकोण प्रतिबिंबीत करते.

गीताभाष्ये, संत साहित्य, रामकृष्ण – विवेकानंद आणि भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृती हे चार प्रमुख विषय करंदीकरांच्या उपर्युक्त लेखनाच्या केंद्रस्थानी आहेत. 'वामन पंडितांची यथार्थदीपिका' या ग्रंथात वामनांनी गीतेचा यथार्थ स्पष्ट करण्याच्या भूमिकेतून कर्म, ज्ञान, योग आणि भक्ती या उपविषयांचे जे विवरण केले आहे त्याची साद्यन्त चर्चा करंदीकरांनी केली आहे. वामनांनी लावलेल्या गीतेच्या भक्तिपर अर्थाचे विश्लेषण व मूल्यमापन करंदीकर करतात. 'गीतेचे तीन टीकाकार' या ग्रंथात ज्ञानेश्वर, वामन पंडित व लोकमान्य टिळक या तिघांच्या गीताभाष्यांचा तौलनिक अभ्यास त्यांनी सविस्तरपणे मांडला आहे. करंदीकरांनी केलेल्या ज्ञानेश्वरविषयक लेखनात 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभव' या दोन ग्रंथांचा चिकित्सक अभ्यास त्यांनी मांडला आहे. ज्ञान, कर्म, भक्ती, योग, सगुण–निर्गुण, क्षराक्षर, उत्तम पुरुष या सर्वांची संगती ज्ञानेश्वरांनी कशा प्रकारे लावली आहे, सांख्य– योग– वेदान्त ही दर्शने आणि भगवद्गीता यांच्या संदर्भात ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान व त्यांचे वेगळेपण कशा प्रकारे समजावून घेता येते ते करंदीकरांनी सविस्तर स्पष्ट केले आहे. 'ज्ञानेश्वरी' हा विशाल सामाजिक पातळीवरून केलेला श्रोतृसंवाद, 'चांगदेवपासष्टी' हा व्यक्तिगत पातळीवरून साधलेला मित्रसंवाद, तर 'अनुभवामृत' हा ज्ञानदेवांचा आत्मसंवाद अशी करंदीकरांची या कृतींकडे पाहाण्याची दृष्टी आहे. जनकल्याणाच्या भावनेने सर्वसामान्यांनाही समजावे अशा स्वरुपात ज्ञानेश्वरांनी गीतेतील तत्त्वज्ञान ज्ञानेश्वरीत विशद केले आहे, ज्ञानेश्वरीच्या तुलनेने 'अमृतानुभवा' चे स्वरूप मात्र वेगळे आहे हे करंदीकरांनी आपल्या ग्रंथात सप्रमाण मांडले आहे. अमृतानुभवाचे आकलन वाचकांना यथामूल व्हावे, असा करंदीकरांचा प्रयत्न आहे.

या विश्वात ओतप्रोत भरून राहिलेले जे एकले एक स्वप्रकाश, स्वसंवेद्य असे वस्तुतत्त्व आहे, जेथे दुजेपणाची कोणतीच कल्पना टिकू शकत नाही, सत्, चित् वा आनंद ही लक्षणे जेथे पोचू शकत नाहीत, अज्ञान आणि ज्ञान या दोहोंच्या अतीत निखळ ज्ञानमात्र व केवळ असणेपणाने युक्त आहे अशा आत्मतत्त्वाचा ज्ञानदेवांना आलेला प्रत्यय 'अमृतानुभवा'मधून ज्ञानेश्वरांनी सलगपणे उलगडून दाखविला आहे, असा 'अमृतानुभवा'चा करंदीकरकृत अन्वयार्थ आहे. अन्य संतांपेक्षा रामदासांच्या साहित्याचे व कार्याचे वेगळेपण यथार्थपणे व्यक्त करणारे नॅशनल बुक ट्रस्टसाठी लिहिलेले 'रामदासचरित्र', विवेकसंबद्ध विचारांना केंद्रवर्ती ठेवून रामदासांच्या निवडक वेच्यांचे केलेले संपादन व समर्थांच्या साक्षेपी व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देणारी 'आकाशभाषित' ही करंदीकरांची निर्मिती त्यांच्या संत साहित्याच्या सूक्ष्म अभ्यासातून घडली आहे.

करंदीकरांचा 'सांस्कृतिक संचित' हा ग्रंथ महाराष्ट्राची धार्मिक परंपरा, मराठी संत मंडळाचे कार्य, मराठीतील तत्त्वविचार जोपासणारे वाङ्मय, मराठी समाजाचे एकंदर विचारविश्व आणि जीवनविषयक दृष्टीकोण, भारतीयांची नीतिकल्पना आणि जीवनादर्श यांचा सविस्तर व मर्मग्राही ऊहापोह करीत असतानाच पारंपरिक अध्यात्मविचार आणि आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन यांची तौलनिक मीमांसा करणारा आहे. 'रामकृष्ण आणि विवेकानंद' हा त्यांचा ग्रंथ ख्यातनाम गुरुशिष्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्याचा साधार परिचय करून देणारा आहे. विवेकानंदांचे त्रिखंडात्मक चरित्र सिद्ध करण्यापूर्वी करंदीकरांनी विवेकानंदांसंबंधीचे सर्व महत्त्वाचे साहित्य अभ्यासले, विवेकानंद ज्या ज्या ठिकाणी गेले ती सर्व स्थाने पाहिली, आणि चरित्राला प्रामाण्य लाभेल याकडे लक्ष पुरविले. रामकृष्ण संघ व संस्थेसंबंधी लिहिलेल्या ग्रंथात करंदीकरांनी 'रामकृष्ण मिशन'च्या स्थापनेपासून शंभर वर्षांत संपूर्ण जगभर मिशनने जे कार्य केले त्याचा इतिहास आणि त्या कार्याचे मर्म तपशीलवारपणे स्पष्ट केले आहे. करंदीकर प्रभावी वक्ते म्हणून सर्व महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहेत. करंदीकरांचे अनेक महत्त्वाचे ग्रंथ हे त्यांनी संबंधित विषयावर दिलेल्या व्याख्यानातून निर्माण झाले आहेत. एक नामवंत वक्ता आणि व्यासंगी लेखक अशी त्यांची प्रतिमा आहे.

समीक्षक या नात्याने 'ग्रंथवेध' आणि 'ग्रंथशोध' या दोन पुस्तकांत त्यांनी केलेली विस्तृत परीक्षणे आली आहेत. ही परीक्षणे त्यांच्या साहित्य विषयक आकलनाची, निर्भीड प्रतिपादनाची व समतोल मूल्यमापन शक्तीची द्योतक म्हणता येतील. यांपैकी काही परीक्षण लेखांतून न. र. फाटक, रा. चिं. ढेरे, म. वा. धोंड यांसारख्या नामवंत अभ्यासकांच्या विचारांचा परखड परामर्श त्यांनी घेतला आहे आणि तटस्थ अवलोकनातून हाती येणार्या निष्कर्षांची सुसंगत व समतोल मांडणी त्यांनी केली आहे. 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' हे करंदीकरांच्या आयुष्यातील महत्त्वाचे कार्यक्षेत्र होय. अगदी तरूण वयापासून ते जवळपास पंचाहत्तरीपर्यंत करंदीकर संघाशी संबंधित होते. संघाचे प्रचारक म्हणूनही त्यांनी काम केले आहे. त्यामुळेच 'तीन सरसंघचालक' हा डॉ. हेडगेवार, गोळवलकर गुरुजी आणि बाळासाहेब देवरस यांच्या कार्याचे समालोचन करणारा त्यांचा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. करंदीकरांच्या ग्रंथांना महाराष्ट्र शासनाची आठ पारितोषिके मिळाली आहेत परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे असे अखिल भारतीय दोन सन्मान त्यांना लाभले आहेत. त्यांपैकी एक 'श्रीगुरुजी पुरस्कार' आणि दुसरा रामकृष्ण मिशनच्या वतीने दिला जाणारा 'विवेकानंद पुरस्कार' होय.

येशू ख्रिस्त, गौतम बुद्ध आणि भगवान श्रीकृष्ण या तीन विभूतींच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्याचा परिचय परस्परांच्या प्रकाशात करून देणारा 'ख्रिस्त, बुद्ध आणि श्रीकृष्ण' हा त्यांचा शेवटचा ग्रंथ त्यांच्या जिज्ञासू वृत्तीचे व प्रासादिक लेखनशैलीचे नमुनेदार दर्शन घडविणारा म्हणता येईल. या ग्रंथानंतर वयाच्या नव्वदाव्या वर्षी त्यांनी आपले लेखन थांबवले आहे. कोणतेही लेखन विस्ताराने करावे हा त्यांचा लेखन स्वभाव आहे. त्यामुळेच त्यांच्या आजवरच्या साहित्य निर्मितीची पृष्ठसंख्या साडेनऊ हजारांच्या आसपास पोचली आहे. १५ एप्रिल २०१३ रोजी त्यांचे निधन झाले. **–डॉ. विलास खोले**

## बदलते तंत्रज्ञान

# सावधान, कधीही हॅक होऊ शकतो तुमचा आयफोन...




आयफोन, आयपॅड, मॅकबुकसारखी महागडी डिव्हाईसेस वापरणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी आहे. केंद्र सरकारच्या संस्थेने तुमची अ‍ॅपल डिव्हाईस हॅक होऊ शकतात, असा इशारा दिला आहे. अ‍ॅपलच्या डिव्हाईसेसमध्ये अनेक कमतरता असून त्याद्वारे हॅकर्स तुम्हाला लक्ष्य करू शकतात असे म्हटले गेले आहे.

अ‍ॅपलची उत्पादने बहुतांश श्रीमंत लोक, महत्वाची लोक वापरत असतात. सर्वात सुरक्षित म्हणून या कंपनीच्या उत्पादनांची ख्याती आहे. परंतू, गेल्या काही काळात अ‍ॅपलची डिव्हाईस हॅक केल्याची प्रकरणे राजकारणी, उद्योजकांसोबत घडली आहेत. संसदेतही याची वाच्यचा झाली आहे. भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत काम करणारी संस्था CERT-In (इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम) ने हा इशारा दिला आहे.


अ‍ॅपल डिव्हाईसमध्ये अनेक सुरक्षा त्रुटी आहेत. हॅकर्सनी याचा वापर केला तर ते तुमच्या डिव्हाइसवर पूर्ण नियंत्रण मिळवू शकतात किंवा तुमचा डेटा चोरी करू शकतात. सिस्टम पूर्णपणे क्रॅश करू शकतात, असा इशारा सीईआरटी ईनने दिला आहे. आयफोन, आयपॅड, मॅकबुक, अ‍ॅपल टीव्ही अशा उपकरणांचा यात समावेश आहे.

सुरक्षा यंत्रणा बायपास करण्यासारख्या त्रुटी यात आहेत. स्पूफिंग किंवा सेवा नाकारणे (DoS) हल्ले करू शकतात. सिस्टिममधील तुमचे अधिकार वापरू शकतात, असे CIVN-२०२५-००७१ या गाईडलाईन्समध्ये म्हटले आहे. हा धोक्याच्या इशारा उच्च पातळीच्या श्रेणीत ठेवण्यात आला असून जर तुमच्याकडील डिव्हाईसेस वेळेत अपडेट केली नाहीत तर ती हॅकर्सच्या नियंत्रणात जाण्याचा धोका व्यक्त करण्यात आला आहे. तुमचा डेटा बदलू शकतात. यामुळे सीईआरटीने सावध राहण्यास सांगितले आहे.

# मराठीतील गझलसम्राट सुरेश भट

सुरेश भट हे मराठी गझल विश्वातील एक अजरामर नाव. त्यांच्याशिवाय मराठी गझल हा विषयच पूर्ण होत नाही. गझल मराठी माणसांपर्यंत पोहचवली ती सुरेश भट यांनी. गझलचे सादरीकरणाचे वेगवेगळे कार्यक्रम करून त्यांनी गझलचा प्रसार आणि प्रचार केला. 'लाभले आम्हास भाग्य' ही त्यांची गझल अनेक लोक म्हणतात, कतात. सुरेश भटांनी यांनी उर्दू भाषेतील शेर शायरी, गझल यांचा आयुष्यभर मनापासून आभ्यास केला. गझल हा काव्य–प्रकार मराठीत रुजवला. हा त्यांचा प्रयास त्यांना 'गझल सम्राट' हा मनाचा किताब देऊन गेला.

विदर्भातील अमरावती या शहरात सुरेश भटांचा जन्म १५ एप्रिल १९३२ रोजी झाला. तिथेच ते लहानाचे मोठे झाले. वडील डॉक्टर असल्याने घरची परिस्थीती बरी होती आणि त्यांच्या आईला कवितेची खूप आवड होती. यातूनच सुरेश भटांना कवितांची आवड निर्माण झाली. सुरेश भट यांना लहानपणीच मराठी कवितांची आवड निर्माण झाली. ते अडीच वर्षाचे असताना त्यांना पोलियोची बाधा झाली होती. त्यामुळे त्याचा उजवा पाय जन्मभरासाठी अधू झाला होता. त्यांचे सर्व शिक्षण अमरावती येथे झाले. बीए पास झाल्यानंतर ते शिक्षकी व्यवसायात आले. अमरावती जिल्ह्यात ग्रामीण भागात नोकरी करताना



## विशेष

त्यांनी त्यांचे कविता लेखन सुरू ठेवले होते, पण ते काही लिहित होते ती गझल आहे हे त्यांनाही माहिती नव्हते. त्यांना उर्दू भाषेचाही चांगलाच अभ्यास होता. सुरेश भट हे जरी विदर्भातील असले तरी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्यांची ओळख होती. हृदयनाथ मंगेशकर यांनी सुरेश भट यांना शोधून काढले आणि भटांच्या कविता, गझल त्यांनी संगीतबद्ध केल्या.

मराठीतील अनेक प्रसिद्ध सिनेमांमध्ये त्यांच्या गझल घेण्यात आल्या. सुरेश भटांनी एकूण पाच गझलसंग्रह लिहिले त्यात 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार', 'झंझावात', 'सप्तरंग' यांचा समावेश आहे. वेगवेगळे रस, रंग असणारी मराठी गझल त्यांनी रेखाटली. फक्त श्रृंगार, प्रेम, विरह इतकच नाहीतर त्यांनी आपल्या गझलमधून समाजाचे दु:ख मांडले, राजकीय लोकांचा भ्रष्टाचार मांडला. बदलता समाज, बदलती माणूसकी मांडली. त्यांच्या अनेक गझल बीएच्या अभ्यासक्रमात घेण्यात आल्या.

माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य गझलसम्राट म्हणजे सुरेश भट असे वर्णन सुरेश भट यांचे करता येईल. आज त्यांच्यमुळे मराठी गझलला मानाचे स्थान मिळाले आहे. त्यांच्या गझल संग्रहांना आजही मोठी मागणी आहे. त्यांची गझल ही कोणत्याही एका वर्गाची नव्हती. अनेक साहित्यिकांनी गझलला मान्य केले नव्हते पण सुरेश भट लढले आणि त्यांनी गझलला अधिकत सन्मान मिळवून दिला. सुरेश भटांनी गझल फक्त त्यांच्यापुरतील मर्यादीत न ठेवता अनेकांना ती शिकवली. आज महाराष्ट्रात त्यांच्याकडून गझल शिकलेले कित्येक गझलकार आहेत.

सुरेश भट यांनी मराठी गझलच्या विश्वात अमूल्य असं काम केले होते. त्यांच्या गझल व कविता हृदयनाथ मंगेशकर, लता मंगेशकर, आशा भोसले, सुरेश वाडकर, भिमराव पांचाळे यांसारख्या अनेक मोठ्या गायकांनी गायल्या आहेत. गडचिरोली येथे भरलेल्या ३९व्या विदर्भ साहित्य संमेलनचे ते अध्यक्ष होते. १४ मार्च २००३ रोजी त्यांचे निधन झाले. **–संजीव वेलणकर**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# नसांमधील कोलेस्ट्रॉल दूर करेल 'हा' ज्यूस

आजकाल चुकीच्या जीवनशैली अनेक आजार आपल्या मागे लागतात. अयोग्य आहारामुळे शरीरातील नसांमध्ये कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोकाही बळावतो. नसांमधील कोलेस्ट्रॉल कमी करायचं असेल तर एक ज्यूस तुमचं काम सोपं करणार आहे.



आजकाल धावपळीच्या जीवनात चुकीच्या आहाराचं सेवन मोठ्या प्रमाणात केलं जातं. या अनहेल्दी लाईफस्टाईलमुळे कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोका असतो. शरीरात वाईट आणि चांगलं अशा दोन प्रकारचं कोलेस्ट्रॉल असून वाईट कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याचा धोका वाढतो.

शरीरात कोलेस्ट्रॉल वाढू नये यासाठी चांगला आहार घेणं गरजेचं आहे. मात्र तुम्हाला माहितीये का, असा एक ज्यूस आहे तो तुमच्या नसांमध्ये जमलेलं वाईट कोलेस्ट्रॉल साफ करण्यात मगत करतं. शिवाय या ज्यूसच्या सेवनाने हृदयविकाराचा झटका येण्याचं प्रमाण देखील कमी होतं.

**कोणता आहे हा ज्यूस?**

हा ज्यूस आवळा आणि गाजरचा आहे. मुळात आवळा आणि गाजर या दोन्ही गोष्टी आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. आवळ्यामध्ये व्हिटॅमीन सीचं प्रमाण भरपूर असतं. जे कोलेस्ट्रॉलला कंट्रोल करण्यासाठी देखील फायदेशीर असतं. दुसरीकडे गाजरामध्ये बीटा कॅरोटीन असतं जे तुमच्या हृदयापर्यंत पोहोचणाऱ्या नसांना साफ ठेवतं.

**कसा बनवायचा हा ज्यूस?**

हा ज्यूस तयार करण्यासाठी २ आवळे, २ गाजर, थोडसं पाणी आणि स्वादासाठी एक चमचा मध या साहित्याची गरज भासणार आहे. कृती– पहिल्यांदा आवळा आणि गाजर स्वच्छ धुवून घ्या. यानंतर आवळ्याचं ही काढून त्याचे छोट छोटे तुकडे करा. यासोबत गाजराचेही बारीक तुकडे करून घ्या. आता या दोन्ही गोष्टी मिक्सरमध्ये टाकून त्यात थोडं पाणी घाला. यानंतर ते चांगल्या पद्धतीने ब्लेंड करून त्याच मध टाका.

**कधी प्यावा हा ज्यूस?** रोज सकाळी रिकाम्या पोटी हा ज्यूस प्यायल्याने वाईट कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत मिळू शकते. त्याचप्रमाणे हृदयाच्या आजारांचा धोकाही कमी होतो. आवळा आणि गाजराचा ज्यूस नैसर्गिकरित्या कोलेस्ट्रॉल कमी करतं. त्याचप्रमाणे हा ज्यूस शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकतो. हृदयाच्या आरोग्यासोबत तुमची रोगप्रतिकारक शक्तीदेखील मजबूत होण्यास मदत होते.

# धार्मिक स्थळांवरील अनधिकृत भोंग्यांवर कारवाई करा

## भाजप नेते किरीट सोमय्या यांची अलिबाग पोलिसांकडे मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहर आणि आसपासच्या परिसरातील धार्मिक स्थळांवरील अनधिकृत भोंग्यांवर कारवाई करा अशी मागणी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सोमवारी केली. अलिबाग पोलीस ठाण्याचे निरीक्षक किशोर साळे यांची भेट घेऊन त्यांनी ही मागणी केली.



सध्या धार्मिक स्थळांवर लावलेले अनधिकृत भोंगे आणि त्यावरून होणारे ध्वनीप्रदूषण हा कळीचा मुद्दा बनला आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र सरकारने ध्वनीप्रदूषणाविषयी नियमावली निश्चित केली आहे. त्यामध्ये शांतता क्षेत्रात रात्री ४० तर दिवसा आवाजाची मर्यादा ५० डेसिबल इतकी असावी. निवासी क्षेत्रात आवाजाची मर्यादा रात्री ४५ तर दिवसा ५५ डेसिबलपर्यंत असावी. वाणिज्य क्षेत्रात हीच मर्यादा रात्री ५५ तर दिवसा ६५ डेसिबलपर्यंत आहे आणि औद्योगिक क्षेत्रात आवाजाची मर्यादा रात्री ७० तर दिवसा ७५ डेसिबल इतकी आहे. असे असले तरी धार्मिक स्थळांवर कायमस्वरुपी लावलेले भोंगे प्रत्यक्षात लावलेल्या ठिकाणी ही आवाजाची मर्यादा पाळत नाहीत.

भोंगे लावल्याने कायद्याचे उल्लंघन होत नाही. मात्र त्यासाठी स्थानिक पोलीस ठाण्याची अनुमती घेऊन आणि वरील आवाजाच्या मर्यादित ते लावणे बंधनकारक आहे, मात्र त्याचे पालन होत नाही. धार्मिक स्थळांवर कायमस्वरूपी लावलेल्या भोंग्यावर धडक कारवाई करावी, अशी मागणी किरीट सोमय्या यांनी केली.

दरम्यान धार्मिक स्थळांवर लावलेले भोंगे अधिकृत आहेत की अनधिकृत याची पडताळणी केली जाईल. ध्वनी प्रदूषण मापक यंत्राद्वारे आवाज मर्यादा तपासली जाईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर उद्यापासून कारवाई करू अशी ग्वाही यावेळी पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी दिली.

# बंजारा समाज माझ्या पाठीशी ठामपणे उभा –आमदार थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

'सेवालाल नगर हे आपले कुटुंब असून बंजारा समाजाने शिवसेना पक्षाची कायम पाठराखण केली आहे. त्यामुळे या ठिकाणी मंदिर उभारणीसाठी निधी देवून थांबणार नाही तर या परिसराचा विकास व्हावा. यासाठी एक कोटींचा निधी मंजूर करून आणण्याचे आश्वासन दिले होते. आपला समाज मेहनत करण्यासाठी ओळखला जातो आणि त्यामुळे राज्याच्या उभारणीत धाम गाळणाऱ्या समाजासाठी काहीतरी करता येत आहे. याचा आनंद होतआहे. हा समाज कायम माझ्या पाठीशी आहे.' असा विश्वास आमदार महेंद्र थोरवे यांनी येथे व्यक्त केला.



कर्जत येथील सेवालाल नगर मध्ये असलेल्या जय अंबे मंदिराचा जिर्णोद्धार करणेसाठी शासनाने ८० लाख रुपयांचा निधी दिला आहे. त्याशिवाय त्या भागात स्वच्छतागृह उभारण्यासाठी १० लाखाचा निधी मंजूर असून या दोन्ही कामांचा शुभारंभ आमदार महेंद्र थोरवे यांचे हस्ते करण्यात आला होता सेवालाल जगदंबेमाता मंदिराच्या भूमिपूजन सोहळ्याचे प्रसंगी काशी येथील बाबूसिंग जगतगुरु महाराज पवरा,शेखर महाराज पवरा जय सेवालाल जगदंब ट्रस्टचे पुनु महाराज ,कर्जत नगरपरिषदचे माजी नगरसेवक ॲड. संकेत भासे आणि बंजारा समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते देविदास चव्हाण आदी प्रमुख उपस्थित होते.

खालापूर मधील बंजारा समाज आमदार महेंद्र थोरवे यांच्या विकासकामांमुळे आनंदी असून भविष्यात देखील आमदारांची साथ देणार असल्याचे स्पष्ट केले.

# पेणमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**पेण : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती पेण नगरपरिषद व विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्या वतीने साजरी करण्यात आली.

यावेळी महात्मा गांधी मंदिर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी सामुदायिक बुद्धवंदना करण्यात आली. तसेच यानिमित्त शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास देखील पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी मा. नगराध्यक्षा प्रितम पाटील, मा. उपनगराध्यक्षा वैशाली कडू, गटनेते अनिरुद्ध पाटील, आनंद जाधव, मा. नगरसेवक अजय क्षिरसागर, नाना पवार, जनार्दन जाधव, नगरसेवक व बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पेण नगरपरिषदेच्या सभागृहातही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी शुभांगी वाशीकर यांनी बुद्धपूजा पाठ सादर केले. यावेळी बोलताना मा. नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सांगितले कि, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील प्रत्येक घटकाचे जीवन सुखकारक कसे होईल यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि हे दूध जो पितो तो गुरगुरल्याशिवाय राहत नाही, या माध्यातून शिक्षणाची जनजागृती केली.

त्याचप्रमाणे समाजातील दुर्बल घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वतःचे आयुष्य दिले.अशा महामानवाला १३४व्या जन्मदिनी अभिवादन करून माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी सर्व समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी उपस्थित लोकप्रतिनिधी व नागरिकांना बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी विविध सामाजिक संघटनाच्या वतीनेही बाबासाहेबांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

## भारतरत्न डॉ. आंबेडकर यांची जयंती उत्साहात

**माणगाव :** जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे १४ एप्रिल रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरा करण्यात आली.

विद्यालयाचे उप–प्राचार्य मनोज राऊत यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला दीप प्रज्वलन व माल्ल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन विद्यालयाची संगीत शिक्षिका सीमा श्रीवास मॅडमनी केले. विद्यालयाचे विद्यार्थी हर्ष दळवी, स्वरा सोनकांबळे,जास्वी, श्रावणी मोरे अनिकेत गांगुर्डे व प्रबुद्ध कांबळे या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाबद्दल महत्वपूर्ण माहिती सांगितली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजातील दलित, शोषित–पीडित, अज्ञानी, कामगार, शेतकरी, बहुजन समाज आणि महिलांचे अधिकार आणि हक्क, भारतीय समाजात महिलांचे स्थान किती महत्त्वपूर्ण आहे, याची माहिती वरिष्ठ शिक्षिका रश्मी मिश्रा यांनी दिली


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड जिल्हा रायगड ४०२३०१**

| | | |
|---|---|---|
| WWW.mahapwd.gov.in | Fax (०२१४५) २२३६५९ | email: mahad.eemahapwd.gov.in pwdmahad.tc.gmail.com |
| जा.क्र.मवि/लेशा/निविदा/१४६२ | Phone (०२१४५) २२२१६७ | दिनांक : ११.०४.२०२५ |

**ई निविदा शुध्दिपत्रक क्र. १ सन २०२५-२६**

संदर्भ – या कार्यालयाची निविदा सुचना क्र. ०३ सन २०२५–२६ जा.क्र./मवि निविदा/१३९३ दिनांक ०७.०४.२०२५

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १. | सुतारवाडी येथे ४ स्वतंत्र हॅलिपॅड तयार करणे ता रोहा जि रायगड | १३९००११५/– |

वरील निविदा सुचना दिनांक ०८.०४.२०२५ पासुन प्रसिध्द करणेत झाली होती. परंतु तांत्रिक कारणास्तव सदर निविदेचा कालावधी पुढील तक्त्यात नमुद केलेनुसार गृहीत धरुन निविदा भरावी हि विनंती.

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | पुर्वीचा कालावधी | निविदा भरण्याचा सुधारीत कालावधी |
|---|---|---|
| निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ०८/०४/२०२५ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक १५/०४/२०२५ वेळ १८.०० वाजपर्यत | दिनांक १५.०४.२०२५ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक २२.०४.२०२५ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| ऑनलाईन व्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड सा. बां. मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक १६.०४.२०२५ वेळ ११.०० वाजता | अधीक्षक अभियंता, रायगड सा. बां. मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक २३.०४.२०२५ वेळ ११.०० वाजता |

सही/–
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**


# राज्यस्तरीय जलद गणेशमूर्ती बनविण्याच्या स्पर्धेत पेणचा स्वप्नील पाटील प्रथम

## तीन तास ५६ मिनिटात मूर्ती बनवून रंगविली

पेण : प्रतिनिधी

राज्यस्तरीय कला प्रदर्शन भिवंडी येथे नुकत्याच झालेल्या मूर्ती बनविण्याच्या स्पर्धेत बहिराम कोट तालुका पेण मधील राहणारा स्वप्नील राजेश पाटील प्रथम आला

अनेक जिल्ह्यातील कलाकार ( मूर्तिकार ) या स्पर्धेत सहभागी झाले होते. सहा तासांमध्ये गणेश मूर्ती बनवुन व रंगवून उत्कृष्ट गणेश मूर्ती तयार करण्याची स्पर्धा होती. त्यात रायगड जिल्ह्यातून मूळ बहिराम कोट तालुका पेण मधील राहणारा २४ वर्षीय स्वप्नील राजेश पाटील याने केवळ ३ तास ५६ मिनिटात इतरापेक्षा सर्वात जलद गणेश मूर्ती बनविली.

त्याच्या या कृतीस राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळाला असून . याशिवाय त्या बनविलेल्या उत्कृष्ट मूर्ती स्पर्धेत सुध्दा दुसरा क्रमांक त्याने मिळविला. त्याच्या या यशाबद्दल त्याचे अभिनंदन होत आहे.



# नवोदय विद्यालय स्थापना दिवस उत्साहात साजरा

**माणगाव : बातमीदार**

जवाहर नवोदय विद्यालय निजामपू येथे रविवार दि.१३ एप्रिल रोजी नवोदय विद्यालय स्थापना दिवस सायंकाळी ६.३० वाजता साजरा करण्यात आला आहे.

प्रभारी प्राचार्य मनोज राऊत यांच्या शुभहस्ते माँ शारदेला दिपप्रज्वलन व मल्ल्यार्पण करून झाली. कार्यक्रमाचे संचालन सीमा श्रीवास व भाग्यश्री जाधव यांनी केले. या कार्यक्रमात विद्यालयाच्या विद्यार्थिनींकडून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले.

हार्ट गोरेगावकर याच्याकडून एकदंताय वक्रतुण्डाय या गीतांवर नृत्य, श्रवंती मिंदर्गी ग्रुपकडून कटपुतली नृत्य, संस्कृती काळे गीत गायन, तन्मय व कार्तिकी उचाळे महाभारत नृत्य, इयत्ता सातवीच्या आदिती सोनावळे ग्रुपकडून गुन गुन गुना रे गुन गुन गुना रे, ऋग्वेद झिंगे गीत गायन,वेद बडे आणि हर्ष मिटकर यांच्याकडून तबला आणि पेटी वादन, इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनी कुमारी श्राव्य आणि ग्रुपकडून भवानी गीत इयत्ता आठवीचे विद्यार्थी मयंक भोसले ग्रुपकडून नाटिका असे विद्यार्थिनी आणि विद्यार्थ्यांकडून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती रातवड विद्यालयात साजरी



**माणगाव :** महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती माध्यमिक विद्यामंदिर रातवड मध्ये अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

शाळेचे मुख्याध्यापक संतोष कदम, व्याख्याती जान्हवी पालकर व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन सांस्कृतिक प्रमुख शिक्षक अजित शेडगे यांनी केले.

व्याख्याती, विद्यालयाची माजी विद्यार्थिनी जान्हवी पालकर यांनी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील विविध पैलूंची माहिती दिली. डॉक्टर बाबासाहेबांनी विद्यार्थी म्हणून घेतलेले परिश्रम, त्यांची अभ्यास वृत्ती , संविधान निर्मिती याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
ई निविदा सूचना क्रमांक ०३/२०२५-२०२६ (मुंबई)
म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... पोलादपूर येथील सावित्री धरणातील १२.०० मीटर X ६.५ मीटर आकाराच्या ८ नंबरच्या रेडियल गेट, ३६ मेट्रिक टन होइस्ट असेंब्ली व संबंधित भागांची देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹ ३६,५३,६६५.०० |
| २. | खांदा कॉलनी, पनवेल येथील प्रशासकीय इमारतीचे व तळोजा येथील सामाईक सुविधा केंद्र इमारतीची देखभाल व दुरूस्ती....... खांदा कॉलनी, पनवेल येथील प्रशासकीय इमारत व तळोजा उप- विभागीय कार्यालयातील स्प्लिट टाइप व कॅस्केड टाइप एअर कंडिशनिंग युनिट्सची दोन कॅलेंडर वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹ १२,३०,२२२.०० |
| ३. | पेण अलिबाग रिजन पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. पोयनाड येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या खराब झालेल्या पोर्च क्षेत्राची दुरुस्ती करणे व जलशुद्धीकरण केंद्राच्या परिसरामध्ये विविध स्थापत्य कामे करणे. | ₹ २८,०८,४७२.०० |
| ४. | पाताळगंगा येथील नवीन व जुन्या पाणीपुरवठा योजनांची देखभाल व दुरूस्ती......... पाताळगंगा जलशुद्धीकरण केंद्रातील दरवाजे व खिडक्यांची दुरुस्ती व मजबुतीकरण करणे. | ₹ ३९,५४,८२०.०० |
| ५. | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... नांगलवाडी फाटा येथील ७१० मिमी व्यासाच्या नवीन एचडीपीई पाइपलाइनसह जुन्या ६३० मिमी व्यासाच्या एचडीपीई लाइनचे बायपास व्यवस्था करणे. | ₹ ३०,७६,७६४.०० |
| ६. | अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील निवासी झोनमधील एसटीपीचे, सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील संप व पंप हाऊसची देखभाल व साफसफाई करणे. | ₹ २२,७०,६१६.०० |
| ७. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेच्या साखळी क्र. ३३०० ते ३४१० व साखळी क्र. ४००८ ते ४१२९ दरम्यानच्या ६३० मि.मी. व्यासाच्या एचडीपीई सांडपाणी वाहिनीवर अच्छादन करणे. | ₹ ३०,३८,९६६.०० |
| ८. | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... सावित्री धरण परिसरातील गोडाऊन, साइट ऑफिस, धरणाच्या पॅरापेटची भिंत, पॅनेल रूम, पंप हाऊस व जॅकवेलची दुरुस्ती करणे. | ₹ ३८,९०,०९८.०० |
| ९. | विळे भागड विकास केंद्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... साजे जॅकवेल व जलशुद्धीकरण केंद्रातील विद्युत ऊर्जा व वीजेचे ऑडिट करून पाणी व वीजेच्या गुणवत्तेत वाढ करणे. | ₹ ३,२०,०००.०० |
| १०. | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... रवधळ गावाजवळील नागेश्वरी कोल्हापुरी बंधाऱ्याच्या प्लेट्स सन २०२५-२६ व २०२६-२७ या वर्षासाठी काढणे, दुरुस्त करणे व काढून टाकणे. | ₹ ७,२४,५८२.०० |
| ११. | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेच्या एसी प्रेशर, पीएससी व एचडीपीई सांडपाणी वाहिन्यांची सन २०२५-२६ या वर्षासाठी वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹ ३९,५८,८४४.०० |
| १२. | खांदा कॉलनी पनवेल येथील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती...... खांदा कॉलनी पनवेल मधील प्रशासकीय इमारतीच्या मँगलोर टाइल केलेल्या छताचे नूतनीकरण करणे. | ₹ ३१,८५,१३०.०० |
| १३. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.....तळोजा येथील सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या परिसरातील कोसळलेल्या कंपाऊंड भिंतीची दुरुस्ती करणे. | ₹ ३४,१५,१३३.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १७/०४/२०२५ ते दिनांक ०२/०५/२०२५ पर्यत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २२/०४/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २४/०४/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# गुरु स्वतःसाठी न लढता समाजासाठी लढतो हा आदर्श येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहचविणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नवी मुंबई : बातमीदार**

कोणताही गुरु स्वतःसाठी न लढता समाजासाठी लढतो, हा आदर्श त्यांनी आपल्यासमोर ठेवला आहे. हा आदर्श पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरमत समागम कार्यक्रम, एनएमएमसी मैदान, गुरुद्वाराजवळ, नवी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात केले.



यावेळी वनमंत्री गणेश नाईक, आमदार मंदाताई म्हात्रे, प्रशांत ठाकूर, संजीव नाईक, नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त कैलास शिंदे, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता पक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गुरुमत समागम कार्यक्रमात गुरुजींचा आशीर्वाद घेण्यासाठी उपस्थित राहता आले, हे माझे सौभाग्य आहे. आपण सर्वजण गुरुजींचा आशीर्वाद घेतो. गुरु ग्रंथ साहेब यांच्या माध्यमातून जे विचार आपल्यापर्यंत पोहोचतात ते केवळ शीख समुदायाच्या कल्याणासाठी नसून समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी आहेत, असे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, गुरुनानक देव साहेब यांनी जे विचार संपूर्ण देशांमध्ये पोहोचविले. त्यामुळे एक मोठा नानकपंथी समाज उभा राहिला, गुरुनानक देव साहेब यांनी जे विचार आपल्यासमोर ठेवले त्या विचारांवर चालण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे.

आपल्या गुरूंनी नुसते विचार दिले नसून लढण्याची हिंमत व ताकद पण आपल्याला दिली आहे. गुरु तेग बहादूर सिंग यांच्या शहादतचा ३५० वे पर्व सुरू आहे. त्यांना आजही हिंद की चादर असे संबोधले जाते. त्यांनी काश्मिरी पंडितांची जुलुमातून सुटका करण्यासाठी लढा दिला. गुरुगोविंद सिंग यांनी हा वारसा पुढे चालविला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गुरु पुरव पर्वात महाराष्ट्र सरकार सामील होईल. शासनाच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. गुरूंची गाथा जनसामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. पंजाब साहित्य अकॅडमीची पुनर्निर्मिती करण्यात आली आहे. या माध्यमातून त्यांचे विचार जनसामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्यास मदत होईल. अकरा लोकांची कमिटी स्थापन करण्यात आली असून या कमिटीच्या माध्यमातून संवाद साधला जातो. समाजासाठी आवश्यक बाबींची माहिती या कमिटीच्या मार्फत शासनास कळविली जाते. निर्वासित लोक, प्रार्थना स्थळे यांना जागा देण्यात येणार आहे. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना शासनाकडून मदत करण्यात येणार आहे. यावेळी आयोजक आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मुख्यमंत्री महोदयांचा विशेष सत्कारही करण्यात आला.

# उरणमध्ये विविध कार्यक्रमांद्वारे डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**उरण : बातमीदार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या बौद्धजन पंचायत समिती उरण शहर शाखा क्रमांक ८४३ व माता रमाई महिला मंडळ उरण बौद्धवाडी यांच्या वतीने सोमवार ( दि १४ )रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार, विश्वरत्न महामानव, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती महोत्सव उरण शहरात बौद्धवाडी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

रविवार सायंकाळी ७ वाजता बुगीबुगी कार्यक्रम, रात्री १२ वाजता बुद्धपूजा, १४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वा. बुद्ध विहार उरण बौद्धवाडी येथे सामूहिक बुद्धपूजा, १० वा. ध्वजारोहण, १०.३० वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर बालोद्यान उरण येथे सामूहिक बुद्धपूजा, डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे भव्य मिरवणूक असे विविध कार्यक्रम उत्साहात झाले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बौद्धजन पंचायत समिती शाखा ८४३ कमिटीचे अध्यक्ष प्रकाश कांबळे, उपाध्यक्ष हरेश जाधव, चिटणीस विजय पवार, खजिनदार अनंत जाधव, कार्याध्यक्ष हर्षद कांबळे, उपाध्यक्ष अखिलेश जाधव, सहचिटनिस रोशन गाढे, सहखजिनदार सुरेश गायकवाड, बौद्धाचार्य प्रमोद कांबळे, विनोद कांबळे, संदेश वाहक अजय कवडे, संकेत साळवी, माता रमाई महिला मंडळ कमिटीचे अध्यक्षा सुनीता सपकाळे, उपाध्यक्ष संगीता जाधव, सचिव करुणा भिंगावडे, सहसचिव कविता जाधव, सहखजिनदार चंद्रभागा जाधव, संदेश वाहक सुजाता साळवी आदींनी विशेष मेहनत घेतली.

या प्रसंगी आमदार महेश बालदी, उरण नगर परिषदेचे अधिकारी कर्मचारीवर्ग तसेच इतर मान्यवरांनी कार्यक्रमस्थळी भेट देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीपासून ते १७ तारखेपर्यंत दररोज विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती बौद्धजन पंचायत समितीचे अध्यक्ष प्रकाश कांबळे यांनी दिली.



## अनिरुद्ध उपासना केंद्राच्या शिबिरात १५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**उरण : बातमीदार**

रक्ताअभावी कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू होऊ नये तसेच गोरगरिबांना वेळेत रक्त उपलब्ध व्हावा हा मानवतावादी दृष्टिकोन समोर ठेवून अनिरुद्ध उपासना केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नगर परिषद शाळा, पेन्शनर पार्क, उरण शहर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी १९१ रक्तदात्यांची नोंदणी करण्यात आली. त्यापैकी १५१ रक्तदाते स्वीकारण्यात आले.रक्तदानाविषयी जनजागृती करत आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिराला उरण तालुक्यातील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. उरण तालुक्यातील अनिरुद्ध उपासना केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने उरण मध्ये दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते.

अनिरुद्ध अकॅडमी डिझास्टर मॅनेजमेंटच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिराला सद्गुरु ब्लड बँक कोपरखैरणे यांचे महत्वाचे सहकार्य लाभले.

# क्षमतावृद्धी कार्यशाळेतून नमुंमपा अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

सर्वच क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून या बदलांचा अंगिकार करीत स्वत:ला अद्ययावत ठेवणे ही काळाची गरज आहे. विविध विषयांवरील तज्ज्ञांच्या माहितीप्रद व्याख्यानांतून मिळणा-या ज्ञानाचा उपयोग संस्थेच्या प्रगतीसाठी अधिकारी, कर्मचारी यांनी करावा आणि यामधून जनतेला अधिक उत्तम रितीने सेवा पुरविण्यासाठी कृतीशील व्हावे. नावातच नाविन्य असणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने पुरविण्यात येणाऱ्या सेवासुविधांची गुणवत्ता उंचावत राहिल्याने नागरिकांच्या अपेक्षा उंचाविल्या असून त्यांची पूर्तता करताना अधिक जोमाने व सुनियोजितपणे काम करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन या कार्यशाळेचे आयोजन केले होते.



प्रत्येक विभागाने वर्षभरात करावयाच्या आपापल्या कामाची रूपरेषा ठरवून घेऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी असे सांगतानाच कार्यालयीन स्वच्छतेअंतर्गत आत्ता केलेली अभिलेखाचे निंदणीकरण, नष्टीकरण व जतन ही कार्यवाही करण्याचा प्रत्येक वर्षीचा वेळ निश्चित करावा व त्यानुसार कार्यवाही करावी असे त्यांनी निर्देशित केले. आपण करीत असलेल्या प्रत्येक कामात सुधारणा करण्याची दृष्टी ठेवावी हे सांगताना नव्या तंत्रज्ञानाचा अंगिकार करावा हे आयुक्तांनी प्रामुख्याने सांगितले.

सध्या कृत्रिम बुध्दीमत्ता अर्थात ए.आय.चा वापर सुरू झाला असून यापुढील काळात ए.आय.चा वापर सर्वच क्षेत्रात प्रभावीपणे होणार आहे. त्यादृष्टीने नमुंमपा अधिकारी यांनी ए.आय. तंत्रप्रणालीचा कार्यालयीन कामकाजात वापर करावा या उद्देशाने विजयभूमी विद्यापीठाचे संचालक तथा ए.आय.तज्ज्ञ डॉ.अर्पित यादव आणि असोसिएटस डीन डॉ.सालुर पटनाईक यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये त्यांनी ए.आय. तंत्रज्ञानाची विस्तृत माहिती देत प्रात्यक्षिकासह ए.आय. वापराचा सराव करून घेतला. याकरिता प्रशासन विभागाने उपस्थित राहणाऱ्या सर्वांना आधीच सोबत लॅपटॉप अथवा टॅब घेऊन येण्याची सूचना दिली होती.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे यांनी सादरीकरणाव्दारे अर्थसंकल्पानुसार प्रत्येक विभागाने जमा व खर्चाच्या बाजूच्या अनुषंगाने करावयाच्या नियोजन पध्दतीची सविस्तर माहिती दिली. आयुक्त महोदयांनी अर्थसंकल्पात मांडलेले १४७ संकल्प हे नवी मुंबई शहराचे व्हिजन असून त्यानुसार कार्यवाही करण्याचे त्यांनी सूचित केले.

दुसऱ्या सत्रात नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, उद्याने, पाणीपुरवठा आदी सोयी सुविधांच्या दर्जा नियंत्रणासाठी विकसित दक्ष ॲपची माहिती देणारे सादरीकरण नानासाहेब जाधव यांनी केले. यामध्ये त्यांनी थेट प्रक्षेपणात्मक सादरीकरण करून दक्ष पची कार्यप्रणाली समजून सांगितली. या पचा प्रभावी उपयोग करून आपल्या कामात सुधारणा घडविण्यासाठी संबंधितांनी पुढाकार घ्यावा, अशी सूचना आयुक्तांनी केली.

न्यूट्रिशिअन तज्ज्ञ शिल्पी मल्होत्रा यांनी आरोग्याची काळजी घेणे ही आपली प्रधान जबाबदारी असल्याचे सांगत आजारपणाला दूर ठेवण्यासाठी करावयाचे दैनंदिन व्यायाम, योगासने, आहार याविषयी सविस्तर माहिती दिली तसेच उपस्थितांशी संवाद साधत त्यांच्या मनातील शंकांचे समाधान केले.

कार्यशाळेच्या या प्रशिक्षणाचा लाभ निश्चितच नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचारीवृंदाला होईल व यातून त्यांची कार्यक्षमता वाढीस लागेल. नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती घेऊन त्याचा अंगिकार नियमित कामकाजात केला जाईल व त्याव्दारे सेवा गुणवत्तेत वाढ होईल. आणि याचा लाभ नागरिकांना होऊन महानगरपालिकेची प्रतिमा उंचावेल असा विश्वास व्यक्त क्षमतावृध्दी कार्यशाळेसारखे उपक्रम यापुढील काळातही वेगवेगळ्या विषयांवर आयोजित केले जातील असे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सांगितले.

# सव्वातीन वर्षात ३.६१ लाखांहून अधिक नागरिकांची डॉ. आंबेडकर स्मारकाला भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेने ऐरोली सेक्टर १५ येथे उभारलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यतम स्मारक देशापरदेशातील विविध स्मारकांपेक्षा अत्यंत आगळे वेगळे आणि ज्ञान हीच शक्ती या बाबासाहेबांच्या प्रेरणादायी विचारांचे मूर्तीमंत दर्शन घडविणारे ज्ञानस्मारक असल्याचे अभिप्राय स्मारकाला भेट देणा-या विविध क्षेत्रातील मान्यवरांप्रमाणेच लाखोंच्या संख्येने स्मारकाला भेट देणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांनी व्यक्त केले आहेत.

बाबासाहेबांचे हे पुतळा विरहीत स्मारक येथील समृध्द ग्रंथालय आणि इतर अनेक सुविधा कक्षांमधून बाबासाहेबांच्या विचारांचे ठायीठायी दर्शन घडविते तसेच बाबासाहेब जणू आपल्यासोबतच आहेत अशी अनुभूती देत असल्याच्या प्रतिक्रिया याठिकाणी व्याख्यानांमध्ये अनेक नामवंत विचारवंतांनी तसेच स्मारकाला भेट देणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांनी वेळोवेळी जाहीरपणे व्यक्त केल्या आहेत.

५ डिसेंबर २०२१ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनाच्या पूर्वसंध्येला स्मारकातील विविध अत्याधुनिक सुविधांचे लोकार्पण झाले होते. तेव्हापासून मागील ३ वर्ष ४ महिन्यांमध्ये म्हणजेच १२ एप्रिल २०२५ पर्यंत स्मारकाला देशापरदेशातून ३ लाख ६१ हजारहून अधिक इतक्या मोठ्या संख्येने नागरिकांनी रजिस्टरवर नोंद करीत भेट दिली आहे व प्रत्येकाने या स्मारकाच्या वेगळेपणाचे मुक्तकंठाने कौतुक केले आहे.

स्मारकामध्ये बाबासाहेबांचे जीवनचरित्र दर्शन घडविणारे दूर्मीळ छायाचित्रांचे दालन, ऑडिओ व्हिज्युअल सुविधांनी परिपूर्ण इ- लायब्ररीसह समृध्द ग्रंथालय, अत्याधुनिक होलोग्राफीक आभासी चलचित्रप्रणालीव्दारे बाबासाहेबांचे प्रत्यक्ष भाषण ऐकण्याची सुविधा, एकाच वेळी २०० व्यक्ती ध्यान करू शकतील असे भव्यतम ध्यानकेंद्र, संविधानाविषयीच्या पुस्तकाचे विशेष दालन तसेच २५० आसन क्षमतेचे वातानुकुलीत प्रशस्त सभागृह अशा



उत्तम दर्जाच्या सुविधांनी हे स्मारक वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे. स्मारकाचा ५० मीटर उंचीचा भव्य डोम रस्त्यावरून लांबूनच नजरेत भरतो व लक्ष वेधून घेतो. बाबासाहेबांच्या ज्ञानसंपन्नतेचे प्रतिक म्हणून या डोमला पेनच्या नीबचा आकार देण्यात आलेला आहे.

'ज्ञान हीच शक्ती' या बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित ग्रंथावर पेन हाती धरलेली भव्यतम आकर्षक शिल्पाकृती ही जणू या स्मारकाचा आत्मा आहे. याठिकाणी ज्ञानजागर व्हावा यादृष्टीने अगदी सुरुवातीपासूनच येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांची व्याख्याने 'विचारवेध' या शिर्षकांतर्गत आयोजित करण्यात आलेली आहेत. याशिवाय बाबासाहेबांच्या जयंतीचे औचित्य साधून 'जागर' ही व्याख्यानमाला आयोजित करून बाबासाहेबांच्या प्रेरणादायी स्मृतींना वैचारिक आदरांजली अर्पण करण्याची परंपरा अव्याहत सुरु आहे.यावर्षीही 'जागर २०२५' मध्ये प्रा.प्रवीण दवणे, डॉ. हरीश वानखेडे, श्री.अरूण म्हात्रे, प्रा.हर्षद भोसले, श्रीमती छाया कदम, प्रा.मृदुल निळे अशा नामांकितांसह विविध क्षेत्रात कर्तबगारी गाजविणाऱ्या युवकांनी सहभागी होत व्याख्यानमाला यशस्वी केली. प्रत्येक व्याख्यानाला नागरिकांची उत्तम पसंती मिळाली. आजकाल वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे, पुस्तके वाचली जात नाहीत, व्याख्याने ऐकली जात नाहीत असे निराशावादी सूर उमटत असताना स्मारकातील प्रत्येक व्याख्यानाला सभागृह हाऊसफुल्ल भरून सभागृहाबाहेर एलईडी स्क्रिन लावून थेट प्रक्षेपण करणे गरजेचे व्हावे एवढी श्रोत्यांची गर्दी होत असल्याचे काहीसे दुर्मीळ चित्र येथे पहावयास मिळत आहे.

५ डिसेंबर २०२१ रोजी लोकांसाठी खुले करण्यात आलेल्या या स्मारकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महापरिनिर्वाण दिन, संविधान दिन, बौध्द पौर्णिमा अशा चारही दिवशी नागरिकांची ७ - ८ हजारहून अधिक उपस्थिती लाभलेली आहे. शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी साधारणत: ३०० हून अधिक नागरिक याठिकाणी भेटी देताना दिसतात. अनेक नागरिक आपल्या कुटुंबासह स्मारकामध्ये येऊन बाबासाहेबांच्या प्रेरक विचारांना सहकुटुंब अभिवादन करतात. अनेक ठिकाणच्या संस्था, मंडळे, समुह एकत्र येऊन स्मारकाची शैक्षणिक सहल आयोजित करताना दिसतात.

राज्यातील विविध जिल्ह्यांप्रमाणेच देशाच्या विविध प्रांतांतून तसेच परदेशातूनही नागरिक या स्मारकाचे वेगळेपण अनुभवण्यासाठी भेट देत असतात. विविध शाळा, महाविद्यालये आपल्या विद्यार्थ्यांच्या सहली स्मारक दर्शनासाठी आयोजित करीत असून हे स्मारक बघताना विद्यार्थ्यांचा ओसंडून वाहणारा उत्साह व बाबासाहेबांच्या बहुआयामी व्यक्तीमत्वाबद्दल त्यांच्या मनात दाटून आलेला आदर त्यांना नवी प्रेरणा देताना दिसतो.

५००० हजाराहून अधिक ग्रंथसंपदेने समृध्द असे येथील इ-लायब्ररी सुविधेसह अत्याधुनिक ग्रंथालय हे बाबासाहेबांनी लिहिलेल्या व त्यांच्या विचारांचा जागर करणा-या पुस्तकांमुळे अभ्यासकांसाठी एक महत्वपूर्ण सुविधा आहे. याठिकाणी आलेला प्रत्येक माणूस भारावून गेला आहे व त्याने या स्मारकाचे वेगळेपण इतरांना भरभरून सांगितले आहे. त्यामुळे केवळ सव्वातीन वर्षातच ३.५ लाखाहून अधिक नागरिकांनी याठिकाणी भेट देऊन, स्मारक पाहिल्यानंतर भारावून जाऊन या स्मारकाचा नावलौकीक सर्वदूर पसरविलेला आहे.

त्यामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी स्मारकाला भेट देणारी मोठी जनसंख्या विचारात घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेने हा जयंती उत्सव सुव्यवस्थित रितीने संपन्न होण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक ते सर्व नियोजन केलेले आहे. तरी नागरिकांनी बाबासाहेबांना वैचारिक आदरांजली अर्पण करण्यासाठी जयंतीदिनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेक्टर १५, ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# डीपीएस तलावात फ्लेमिंगो परतले

## भरती-ओहोटीच्या पाण्याचा प्रवाह अंशतः पूर्ववत

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील नेरुळ येथील डीपीएस फ्लेमिंगो तलावात गुलाबी पक्षी सुंदरी परत येऊ लागल्या आहेत, कारण पाणथळ जागी होणारा आंतरभरतीचा पाण्याचा प्रवाह अंशतः पूर्ववत झाला आहे, असे पर्यावरणवाद्यांनी म्हटले आहे.



निहित स्वार्थांमुळे भरती-ओहोटीच्या पाण्याचा प्रवाह अडवल्यानंतर नुकसान झालेल्या डीपीएस फ्लेमिंगो तलावाच्या पुनर्संचयनासाठी अथक मोहीम राबवणारे पर्यावरणवादी आता काही प्रमाणात पाण्याचा प्रवाह पूर्ववत झाल्याने आनंद व्यक्त करीत आहे, असे नॅटकनेक्ट फाउंडेशन चे संचालक बी. एन. कुमार म्हणाले.स्थानिक खारफुटी सेल अधिकाऱ्यांसोबत शनिवारी झालेल्या संयुक्त स्थळ तपासणीनंतर कुमार म्हणाले कि तलाव पूर्णपणे पूर्ववत होण्यासाठी अजूनही काही मैलांचा प्रवास बाकी आहे.

मर्यादित पाण्याच्या प्रवाहामुळे, तलावात साचलेल्या जवळजवळ ६०% ते ७०% शैवाल साफ करण्यात आल्याचे रेंज फॉरेस्ट ऑफिसर सुधीर मांजरे यांनी सांगितले. भरती-ओहोटीचे पाणी पूर्ण शक्तीने आत येण्यासाठी आणि बाहेर पडण्यासाठी दोन्ही प्रवेशद्वार खाली करावे लागतील, असे त्यांनी निरीक्षण नोंदवले.

वनमंत्री गणेश नाईक यांनी यापूर्वी नॅटकनेक्ट फाउंडेशनला आश्वासन दिले आहे की त्यांनी नवी मुंबई महानगरपालिका (एनएमएमसी) आणि सिडको अधिकाऱ्यांना पाण्याचा प्रवाह अखंडित राहावा यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. काळजी करू नका, डीपीएस तलाव पुन्हा फ्लेमिंगोंनी फुलल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, असे नाईक म्हणाले.

डीपीएस फ्लेमिंगो तलाव रामसर साइट म्हणून मान्य ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्याच्या उपग्रह वेटलँड परिसंस्थेचा भाग आहे. अनेक फ्लेमिंगो विश्रांतीसाठी आणि अन्नाच्या शोधात खाडीतील भरती-ओहोटीच्या वेळी पांजे, डीपीएस तलाव आणि एनआरआय आणि टीएस चाणक्य पाणथळ जागी उड्डाण करतात.

टीसीएफएस व्यवस्थापन योजनेचा भाग म्हणून बीएनएचएसने वारंवार शिफारस केली आहे की उपग्रह पाणथळ जागांचे संवर्धन करावे लागेल. या प्रणालीतील कोणत्याही गडबडीमुळे पक्ष्यांना येणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील उंच जमिनीवर उतरण्यास भाग पाडले जाऊ शकते ज्यामुळे विमानांना पक्ष्यांचा धोका निर्माण होऊ शकतो, असे बीएनएचएसने म्हटले आहे.

अदानी समूहाच्या व्यवस्थापनाखालील एनएमआयएने केंद्राला दिलेल्या पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अहवालात आणि अनुपालन अहवालात हे अधोरेखित केले आहे आणि विमानतळ परिसरातील जैवविविधता राखण्यासाठी बीएनएचएसच्या शिफारशींचे पालन करण्याची वचनबद्धता व्यक्त केली आहे, असे कुमार यांनी सांगितले

# विभाग अधिकाऱ्यावर कारवाईचा बडगा

**नवी मुंबई : बातमीदार**

सेवा हमी कायद्यांतर्गत १४ दिवसांत तक्रार अर्जावर कार्यवाही करणे अपेक्षित आहे, परंतु महापालिकेचे सहायक आयुक्त तथा तुर्भे विभाग अधिकारी प्रबोधन मावाडे यांनी या कायद्याचा भंग केल्याप्रकरणी त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला आहे.

सामाजिक कार्यकर्ते संकेत डोके यांनी कोपरी विभागातील अतिक्रमणांवर कारवाई करण्याची मागणी तुर्भे विभाग अधिकाऱ्यांकडे केली होती. वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाने तक्रार अर्जाला केराची टोपली दाखविली. त्यामुळे विभाग अधिकारी प्रबोधन मावाडे यांच्यावर सेवा हमी कायद्यांतर्गत कारवाई करण्याची मागणी डोके यांनी १३ फेब्रुवारी रोजी संबंधित विभागाच्या उपायुक्तांकडे केली होती. त्यानुसार अतिक्रमण विभागाच्या उपायुक्तांनी २० मार्च रोजी सेवा हमी कायद्याचा आधार घेत विभाग अधिकारी मावाडे यांच्याकडून कामा दिरंगाई केल्याप्रकरणी खुलासा मागविला आहे. या कारवाईने कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# नेरळमधील अनेकांचा भाजपमध्ये प्रवेश



**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ जिल्हा परिषद वॉर्डमधील अनेकांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. फ्रेंड्स ऑफ बीजेपी रायगड जिल्हा अध्यक्ष नितीन कांदळगावकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत हा पक्षप्रवेश सोहळा माजी आमदार सुरेश लाड तसेच भाजप तालुका अध्यक्ष राजेश भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत नेरळ येथे झाला.

या वेळी माजी आमदार सुरेश लाड यांनी नितीन कांदळगावकर यांना शुभेच्छा देत पक्षात कोणी दुजाभाव न ठेवता पक्षवाढीसाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणे काम केले पाहिजे, असे सांगितले.

भाजप नेते नितीन कांदळगावकर यांचे पक्षवाढीसाठी मोठे योगदान राहिलेले असून आजही ते पक्षाच्या माध्यमातून सर्वसामान्यांसाठी झटत आहेत. नितीन व त्यांची पत्नी नम्रता हे दाम्पत्य निष्काम भूमिकेतून अनेक सामाजिक उपक्रम राबवित आले आहेत. आजवर त्यांनी शेकडोने मोफत नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली असून दीनदुबळ्यांना मदत केली आहे. मोफत नेत्र बिंदू ऑपरेशनही त्यांनी स्वखर्चातून केलेले आहेत आणि म्हणूनच भाजप पक्षाने कांदळगावकर यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी दिलेली दिसते. नम्रता या भाजप कर्जत तालुका मंडळ महिला मोर्चाच्या अध्यक्ष आहेत. उच्चशिक्षित महिला म्हणून त्यांचे नाव असून पती नितीन कांदळगावकर यांचे नेहमीच सामाजिक कार्यासाठी पाठबळ मिळत राहिले आहे.

नतीन कांदळगावकर यांचा ११ एप्रिल रोजी वाढदिवस असल्याने या दिवशी नेरळ जिल्हा परिषद वॉर्डमधील अनेकांनी त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षात प्रवेश केलो. या वेळी नेरळ चिंचआळी येथे राहणारे अशोक गवळी, माजी नायब तहसीलदार जगन्नाथ चव्हाण, ॲड. प्रेमनाथ पाटील, मारुती गोविंद बदे तसेच सचिन वाघ, निलेश मोदी, हुसेन मलिक, जगदीश वढेर, अनंता विरले सुभाष जाधव यांनी पक्षप्रवेश केला. या कार्यक्रमाला भाजप जिल्हा चिटणीस मंगेश म्हसकर, खालापूर तालुका प्रभारी अध्यक्ष सनी यादव, प्रकाश पेमारे संतोष शिंगाडे, हर्षल कुलकर्णी, राहुल मुकणे, दिनेश पेठकर, प्रशांत देशमुख, नरेंद्र कराळे, बिराज भाटकर, संभाजी गरुड, जब्बार सहेद, सुभाष भोसले, बाबू बर्गे महिला मोर्चा कर्जत तालुका अध्यक्ष नम्रता कांदळगावकर नेरळ शहर अध्यक्ष श्रद्धा कराळे हेही उपस्थित होते.

या वेळी सुरेश लाड यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत असताना म्हटले की, पक्षवाढीसाठी प्रत्येकाने आपले महत्त्वाचे योगदान दिले पाहिजे. हेवेदावे दूर सारून एकत्रित काम केले पाहिजे. भविष्यात कर्जत मतदारसंघात भाजप प्रमुख पक्ष असेल. उपस्थितांनी नितीन कांदळगावकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते बामणगाव येथे विकासकामांचे उद्घाटन

**माणगाव : बातमीदार**

निजामपूर विभागातील बामणगाव येथे संत तुकाराम महाराज मंदिर सुधारणा व सुशोभीकरण करणे तसेच मळ्याचीवाडी ते बामणगाव रस्त्याचे उद्घाटन रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते रविवार (दि.१३) झाले.

मळ्याचीवाडी ते बामणगाव या सुमारे ५५ लाख रुपये खर्च करून करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामाचे आणि पर्यटन विकास योजने अंतर्गत १५ लाख रुपये खर्च करून सुशोभीकरण केलेल्या संत तुकाराम महाराज मंदिर कामाचे उद्घाटन या वेळी करण्यात आले. या कार्यक्रमास निजामपूर विभागातील शिवसेना, युवासेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी बामणगाव येथील राष्ट्रवादी आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील महिला भगिनी, सिरसाड ग्रामपंचायतीचे उपसरपंच कृष्णा सुतार यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी केला शिवसेनेत प्रवेश केला.





**माणगाव : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंती दिनानिमित्त लोणेरे विद्यापीठ येथे डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला स्वराज्य संघटनेचे संस्थापक पंकज तांबे, उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे, संभाजी गायकवाड, स्वप्नील शिर्के यांनी अभिवादन केले.**

# जोगेश्वरी माता, भैरवनाथ महाराज पालखी सोहळा उत्साहात

◆ *खासदार सुनील तटकरे यांनी घेतले दर्शन*

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामदैवत जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज पालखी सोहळ्याला अतिशय उत्साही वातावरणात प्रारंभ झाला असून हा पालखी सोहळा सतत ४८ ते ५२ तास सुरु असतो. याच अनुषंगाने राष्ट्रवादी प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी उपस्थित राहत दर्शन घेतले. या वेळी देवस्थान विश्वस्त समिती व उत्सव समितीकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.





या वेळी जोगेश्वरी देवस्थान विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन, सचिव भाई टके, माजी पं.स. सदस्य हरिष काळे, डॉ. राजेंद्र धात्रक, नागोठणे माजी सरपंच विलास चौलकर, प्रकाश जैन, अनिल काळे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, उत्सव समिती अध्यक्ष चंद्रकांत ताडकर, उपाध्यक्ष संतोष चितळकर, सहसचिव अनिल पवार, हरीश टके, अतुल काळे, बिपीन सोष्टे, मनोज टके, चेतन टके, अभिषेक जाधव, ध्रुव सोष्टे, श्रीपाल जैन, जितेश म्हात्रे, लोकेश पंडित, महेश बेंद्रे, शैलेश रावकर, सुरेश जैन, ॲड. श्रीकांत रावकर, ॲड. रमेश जाधव, केतन भोय, उल्हास शिंदे, संतोष कवाडिया, सुनील लाड, ज्येष्ठ ग्रामस्थ तात्या खंडागळे, सखाराम ताडकर, संतोष कोते आदी कार्यकर्त्यांसह उत्सव समितीचे सदस्य व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. दरम्यान, कितीही व्यस्त असतील तरी खासदार सुनील तटकरे वेळात वेळ काढून नागोठण्यातील महत्वपूर्ण कार्यक्रमास हजेरी लावत असतात यावरून त्यांचे नागोठणेवरील प्रेम दिसून येते.

# पर्यटनासह विविध मूल्यांनी नटलेला श्रीवर्धन तालुका घालतोय साद...!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुका म्हणजेच नारळी-पोफळीच्या रांगांनी नटलेला, कौलारू घरांनी संस्कृतीचे दर्शन घडवणारा आणि निळाशार समुद्राच्या साक्षीने जागता इतिहास सांगणारा तालुका. आज महाराष्ट्रातील एक प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून तो नावारूपास येतो आहे. केवळ सौंदर्यच नाही, तर सांस्कृतिक, ऐतिहासिक, धार्मिक आणि सामाजिक मूल्यांनी समृद्ध असलेल्या या भागाला पर्यटकांचे माहेरघर म्हणणं अतिशयोक्ती ठरणार नाही.





खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या सहकार्यातून श्रीवर्धनचा समुद्रकिनारा पूर्णतः नवीन रूपात सजलेला दिसतो. स्वच्छ व खुला समुद्रकिनारा, सुबक वॉकिंग ट्रॅक, मुलांसाठी खेळण्याची ठिकाणे, सुशोभित उद्याने तसेच सायंकाळी लखलखणाऱ्या लाईटिंगमुळे हा किनारा पर्यटकांना दिवसभर खिळवून ठेवतो.

मराठा साम्राज्याचे पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांचा इतिहास जपणारा श्रीवर्धन, इतिहासप्रेमींना आकर्षणाचा केंद्रबिंदू वाटतो. पेशवेकालीन वास्तू, जुनी मंदिरे आणि ऐतिहासिक खुणा इथे आजही जपल्या गेल्या आहेत.

श्रीवर्धनमध्ये प्रवेश करतानाच बाळाजी विश्वनाथ पेशवे प्रवेशद्वार तसेच दिवेआगर येथून श्रीवर्धनमध्ये प्रवेश करताना जिवनेश्वर प्रवेशद्वार तसेच भुवनाळे तलाव, जिवनेश्वर कुंड व त्यामधील विद्युत रोषणाई हे सायंकळी पर्यटकांना आकर्षित करते. श्रीवर्धनपासून अगदी जवळच असलेले हरिहरेश्वर मंदिर, जे दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते, आणि दिवेआगर येथील नारळी पोफळीच्या बागेत जमिनीमध्ये सापडलेली सुवर्ण गणपतीची मूर्ती व तेथे उभारलेले मंदिर श्रद्धाळूंना वेगळाच अनुभव देतात.

श्रीवर्धनपासून २७ किलोमीटर अंतरावर असलेल्या जंजिरा किल्ल्याचे दर्शन घेता येते. समुद्रात वसलेला हा अजिंक्य किल्ला पर्यटकांमध्ये विशेष लोकप्रिय आहे. याशिवाय श्रीवर्धनजवळील जीवना बंदर, भरडखोल बंदर व दिघी बंदरावर होणारी मासळीची लिलाव प्रक्रियादेखील पर्यटकांसाठी आकर्षण असते.

श्रीवर्धनच्या किनाऱ्यावरून होणारी डॉल्फिन सफारी ही पर्यटकांमध्ये विशेष लोकप्रिय ठरली आहे. निळ्या पाण्यात मुक्तपणे उड्या मारणाऱ्या डॉल्फिन्सना प्रत्यक्ष पाहणे ही एक संस्मरणीय अनुभूती असते तसेच स्थानिक बंदरावर दररोज होणारा ताज्या मासळीचा लिलाव म्हणजे ग्रामीण जीवनशैलीचे थेट दर्शन. हा अनुभव पाहण्यासाठी अनेक पर्यटक सकाळी लवकर बंदर गाठतात.

पर्यटकांच्या वाढत्या ओघामुळे स्थानिक व्यावसायिकांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. होमस्टे, रिसॉर्ट्स, स्थानिक खाद्यपदार्थांची दुकाने, बोट सफारी सेवा, मार्गदर्शक व वाहन चालक यांना उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. परिणामी तालुक्याचे स्थानिक अर्थकारण पर्यटनावर आधारित एक स्थिर स्त्रोत म्हणून आकार घेत आहे.

निसर्ग, संस्कृती, इतिहास, धर्म आणि ग्रामीण जीवनशैली यांचे सुंदर मिलन म्हणजे श्रीवर्धन. प्रत्येक ऋतूत पर्यटकांसाठी काही ना काही खास अनुभव देणारे हे ठिकाण आता महाराष्ट्रातील पर्यटन मानचित्रावर एक ठळक नाव बनत आहे.



# रायगडात डोळ्यांचे पारणे फेडणारा फुलांचा उत्सव

सह्याद्रीच्या डोंगर रांगा, विपुल वनसंपदा लाभलेल्या रायगड जिल्ह्यातील डोंगररांगा, रस्त्याच्या कडेला, माळरान व जंगल आदी ठिकाणी ज्वाला फुले म्हणजेच पळस, बहावा, कुडा, पांगरा, पिवळा गुलमोहर/सोनमोहोर, उक्षी, कांचन व कटेसावर आदी झाडांना बहर आला आहे. जणू काही फुलांचा रंगोत्सव येथे सुरू झाला आहे. यामुळे सामान्य नागरिकांसह निसर्ग अभ्यासकदेखील सुखावले आहेत. पर्यटक ही रंगांची उधळण पाहण्यासाठी आवर्जून येथे थांबतात आणि डोळे भरून विविधरंगी फुलांचा आनंद घेताना दिसत आहेत.





निसर्गाचा हा चमत्कार पाहणे म्हणजे एक पर्वणीच आहे. विशेषतः पर्यटकांना ही फुले आकर्षित करतात. फुलांनी बहरलेली ही झाडे अनेक पशु पक्ष्यांना खाद्य व आश्रय देतात. त्यामुळे येथे विविध पक्षांचा किलबिलाट असतो. जैवविविधतादेखील बहरते. या ऋतूतील विविध आकर्षक फुले निसर्ग व पक्षी अभ्यासकांना ही पर्वणी आहे. हा नजारा पाहण्यासाठी अनेक पर्यटकही या ठिकाणी निरीक्षणासाठी आवर्जून येत असतात.

**फ्लेम ऑफ द फायर पळस**

फ्लेम ऑफ द फायर म्हणून ज्याचे वर्णन केले जाते त्या पळसाची लाल व भगवी फुले खूप बहरली आहेत. डोंगराळ भाग, रस्त्याच्या कडेला आणि शेताच्या बांधावरील पळसाच्या झाडावर आलेली ही भडक लाल भगव्या रंगाची फुले जंगलाला आग लागल्याप्रमाणे भासत आहेत. त्यामुळे यांना ज्वालाफुले असेदेखील म्हणतात. एका ब्रिटिश अधिकाऱ्याने या फुलांच्या लालभडक रंगावरून पळसाच्या फुलांना फ्लेम ऑफ द फायर हे नाव दिले आहे.

**भरगच्च बहरलेले गिरीपुष्प**

गिरीपुष्प याला ग्लिरिसिडिया असे नाव आहे. हा पानझडी वृक्ष असल्यामुळे पाने गळून गेल्यानंतर फांद्यांच्या टोकांवर निळी जांभळी फुले गुच्छात येतात. फुलांनी बहरलेले गिरीपुष्प झाड फार सुंदर दिसते. या झाडाची फुले शोभेसाठी वापरली जातात. या झाडांच्या बिया उंदरांनी खाल्यास उंदीर मरतात. या झाडांच्या हिरव्या पानांपासून चांगल्या प्रकारचे कंपोस्ट खत तयार होते.

**मनमोहक देवचाफा**

देव चाफ्याची फुले पांढरी असून मध्यभागी पिवळसर झाक असते. खोड राखाडी रंगाचे असते व खोडाला पारंब्या असतात. ही फुले किंवा या फुलांचा हार देवाला वाहतात. म्हणून सहसा हे झाड देवळाबाहेर लावलेले दिसते. रस्त्याच्या दुतर्फासुद्धा दिसतात.

**सोनमोहोराच्या फुलांचा गालिचा**

याला पिवळा गुलमोहर किंवा ताम्रशिंपी असेदेखील म्हणतात. नाजूक पिवळ्या जर्द पिवळ्या कागदासारख्या पाकळ्यांच्या फुलांमुळे सर्व झाड पिवळेधमक दिसते. झाडाच्या तळाशी गळून पडलेल्या फुलांची आणि पाकळ्यांची सजावट होते. रस्त्यावर पडलेली ही पिवळी फुले जणू काही रस्त्यावर पिवळा गर्द गालीच्या अंथरला आहे याप्रमाणे वाटते. येथून जाणारे वाटसरू व पादचारी यांना ही फुले मनस्वी आनंद देतात.

**पिवळाधम्मक बहावा**

पिवळाधम्मक बहावा बहरला आहे. ही लोंबकळणारी फुले सर्वांचे लक्ष वेधत आहेत. जिल्ह्यात जंगल, माळरानावर व रस्त्याच्या कडेला बहाव्याची फुलांनी बहरलेली झाडे दिसत आहेत. फुलांच्या सोनेरी रंगामुळे हा वृक्ष 'गोल्डन शॉवर ट्री' म्हणून ओळखला जातो.

बहावा पावसाच्या आगमनाची चाहूल देतो. फुलांनी बहरल्यावर साधारण ४५ दिवसांच्या आत पाऊस सुरू होतो. एक उपयोगी व सुंदर वृक्ष म्हणून बहाव्याला ओळखले जाते. याचे शास्त्रीय नाव 'कॅशिया फिस्टुला' मराठी नाव बहावा व कर्णिकार हे आहे, तर संस्कृत नाव आरग्वध आहे. इंग्रजी नाव डरलशीर्पी आणि हिंदी नाव अमलतास आहे.

**लालबुंद मखमली पांगारा**

पांगारा याच्यावर एकही पान नसताना लाल मनमोहक फुलांनी बहरतो. फेब्रुवारी ते एप्रिल या काळात पांगाऱ्याला फुले येतात. याच्या फुलांना गंध नसतो, मात्र फुलांचा लाल रंग आणि मखमली वाटणाऱ्या पाकळ्या कुणालाही आपल्याकडे वेधून घेतात.

**उक्शी गर्द फुले**

झुडपावर उगवलेली उक्शीची गर्द फुले औषधी असतात. ही फुले फिकट व पिवळट हिरवी असून फांद्यांच्या शेंड्यावर परिमंजरीत मार्च-मेमध्ये येतात. रस्त्याच्या कडेला माळरानावर ही झुडपे उगवतात त्यावर प्रचंड दाटीने उक्शी फुले बहरतात.

**चविष्ट सुवासिक कुडाची फुले**

पांढरा कुडा किंवा 'इंद्रजव' किंवा 'कुटज' मूळव्याध, रक्तस्राव, अतिसार, आमांश, अग्निमांद्य या विकारांतील आयुर्वेदिक औषधांमध्ये कुड्याचा वापर होतो. १० ते १५ फूट उंच वाढणाऱ्या या झुडुपास प्रत्येक फांदीच्या टोकाशी मंद सुवास असलेल्या पांढ्या रंगाच्या फुलांचे गुच्छ येतात. याची भाजीसुद्धा करतात.

**कांचनची आकर्षक फुले**

फुले गुलाबी, पांढरी, फिकट जांभळ्या रंगावर गडद जांभळ्या छटा असलेली आणि सुवासिक असतात. यातील चार पाकळ्या फिकट कोनफळी रंगाच्या व पाचवी पाकळी गडद रंगाची असते. काही फुलांच्या एक किंवा दोन पाकळ्यांच्या मुळाशी पिवळ्या रंगाचे ठिपके सुद्धा आढळतात. ही फुले फारच आकर्षक व मनमोहक दिसतात. कांचन या वृक्षाच्या फुलांचा हंगाम हा डिसेंबर ते मार्च किंवा एप्रिलमध्ये असतो.

**आकर्षक व पशूपक्ष्यांचे अन्नदाते काटेसावरचे फुल**

काटेसावरीची फुले मोठी, पाच जाड पाकळ्या आणि रंग गडद गुलाबी, खूप सारे पुंकेसर असलेली असतात. या फुलांना खाण्यासाठी खारुताई झाडावर बागडते. तर फुलांमधून मध गोळा करण्यासाठी वेगवेगळ्या पक्ष्यांची मांदियाळी या झाडावर जमा होते.

**महाराष्ट्राचे राज्यपुष्प ताम्हण बहरले**

महाराष्ट्राचे राज्यपुष्प किंवा राज्यफुल म्हणजे ताम्हण किंवा तामण हे आहे. सध्या जिल्ह्यात जंगल, माळरानावर व रस्त्याच्या कडेला वाहत्या पाण्या शेजारी या जांभळ्या फुलांनी बहरलेली झाडे दिसत आहेत. हिरव्या गर्द रानात ही आकर्षक फुले पाहून प्रसन्न वाटते.

ताम्हण किंवा तामण, जारूळ बोंद्रा/बुंद्रा या नावांनीही परिचित आहे. कोकणात या वृक्षाला 'मोठा बोंडारा' असे म्हणतात. ही झाडे रायगड जिल्ह्यात अनेक ठिकाणी दिसतात. या वनस्पतीला फुले एप्रिल ते मे च्या सुमारास म्हणजेच महाराष्ट्र दिनाच्या काळात बहरत असल्याने याचे फुल महाराष्ट्राचे राज्यपुष्प आहे, मात्र पावसाळ्यातहील या झाडाला बहर येतो. ताम्हणाचे फुल लालसर-जांभळ्या रंगामुळे ओळखले जाते. भरपूर पाणी मिळणाऱ्या ठिकाणी तामणाचे वृक्ष वाढतात. तामण हा रस्त्याच्या कडेने सावलीसाठी लावण्यास उत्तम वृक्ष आहे. फुलातील रंगसंगती सुंदर असते. शांत, शीतल, प्रसन्न रंगाच्या पाकळ्या, त्यांच्या मध्यभागी विरुद्ध रंगाचे पुंकेसर असतात.

# मुंबईने रोखला दिल्लीचा विजयरथ



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

तिलक वर्मा, रेकल्टन, सूर्यकुमार यादव, नमन धीर यांची फटकेबाजी आणि कर्ण शर्मा-सँटेनर यांच्या भेदक गोलंदाजीच्या बळावर मुंबई इंडियन्सने येथील आयपीएल साखळी सामन्यात दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध १२ धावांनी विजय मिळवला. दिल्लीने शेवटच्या टप्प्यापर्यंत संघर्षमय खेळ साकारला, मात्र ठराविक अंतराने गडी बाद होत राहिल्याने त्यांना निर्णायक क्षणी विजयाने हुलकावणी दिली.

विजयासाठी २०६ धावांचे आव्हान असताना दिल्ली कॅपिटल्सचा संघ कोणत्याच वळणावर विजयाच्या मार्गावर असल्याचे दिसून आले नाही. करुण नायरने ४० चेंडूंत १२ चौकार व पाच षटकारांसह ८९ धावांची झंझावाती खेळी साकारली, पण त्याला सहकाऱ्यांकडून योग्य साथ मिळाली नाही. सलामीवीर जेक फ्रेझर-मॅकगर्क गोल्डन डकचा मानकरी ठरला, तर अभिषेक पोरेलने २५ चेंडूंत ३३ धावांचे योगदान दिले. मधल्या फळीत के.एल. राहुल (१५), अक्षर पटेल (९), स्टब्ज (१), आशुतोष शर्मा (१७), विप्रज निगम (१४) ठराविक अंतराने बाद होत राहिले, त्याचा दिल्लीला मोठा फटका बसला.

शेवटच्या टप्प्यात दिल्लीच्या फलंदाजांनी आक्रमणावर भर दिल्याने काही काळ रंगत निर्माण होईल अशी चिन्हे होती, मात्र तोवर कदाचित बराच उशीर झाला होता. नंतरच्या टप्प्यात पडझड सुरूच राहिली आणि अंतिमत: दिल्लीचा डाव १९ षटकांत १९३ धावांवर आटोपला.


तत्पूर्वी तिलक वर्मा (५९), रियान रेकल्टन (४१), सूर्यकुमार यादव (४०), नमन धीर (नाबाद ३८) यांच्या फटकेबाजीमुळे मुंबई इंडियन्सने २० षटकांत पाच बाद २०५ धावांपर्यंत मजल मारली. दिल्लीतर्फे विप्रज निगम व कुलदीप यादव यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

### रन आउटची हॅट्ट्रिक

*अखेरच्या १२ चेंडूत दिल्ली कॅपिटल्सच्या संघाला विजयासाठी २३ धावांची गरज होती. आषुतोष शर्मा मैदानात असल्यामुळे हा सामना दिल्लीच्या हातात होता. १९व्या षटकात बुमराहच्या गोलंदाजीवर त्याने दोन खणखणीत चौकार मारून मॅच सहजा सहजी सोडणार नाही याचे संकेतही दिले, पण या षटकातील तिसऱ्या चेंडूवर तो धावबाद झाला अन् सामना मुंबई इंडियन्सच्या बाजूने फिरला. दिल्लीच्या संघाने पुढच्या दोन चेंडूवरही रन आउटच्या रूपात दोन विकेट गमावल्या अन् मुंबईने रन आउटच्या हॅट्ट्रिकसह १२ धावांनी सामना जिंकला.*

## अक्षर पटेलला १२ लाखांचा दंड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



दिल्ली कॅपिटल्सने आयपीएलच्या १८व्या हंगामात सलग चार सामने जिंकून चांगली सुरुवात केली. त्यांची विजयी मालिका रविवारी संपुष्टात आली. मुंबई इंडियन्सकडून दिल्लीला पहिला पराभव पत्करावा लागला. या पराभवाचे दु:ख पचवतानाच संघाला दुसरा मोठा झटका बसला. बीसीसीआयने कर्णधार अक्षर पटेलवर मोठी कारवाई करत आणि त्याला १२ लाखांचा दंड ठोठावला आहे.

मुंबई इंडियन्सच्या फलंदाजीदरम्यान दिल्ली कॅपिटल्सला निर्धारित वेळेत २० षटके पूर्ण करता आली नाहीत. त्यामुळे स्लो ओव्हर रेटसाठी त्यांचा कर्णधार अक्षर पटेलवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. दिल्ली संघाची ही यंदाच्या हंगामातील पहिलीच चूक आहे.




सौजन्य : संदीप पाटील (पनवेल शहर उपाध्यक्ष), श्रीनिवास म्हात्रे (पनवेल तालुका सचिव)


## बंगळुरूची राजस्थानवर मात



**जयपूर : वृत्तसंस्था**

विराट कोहली आणि फिल सॉल्ट यांच्या अर्धशतकाच्या बळावर रॉयल चॅलेंजर बंगळुरूने राजस्थान रॉयल्सवर नऊ गडी राखून मात केली. या विजयानंतर बंगळुरू संघ गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहचला आहे.

राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकामध्ये चार विकेट गमावून १७३ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात बंगळुरूने १७.३ षटकांत एक फलंदाज गमावून १७५ धावा केल्या. यामध्ये सॉल्टने ३३ चेंडूत ६४ धावा, तर विराटने ४५ चेंडूत ६२ धावा केल्या. यामध्ये देवदत्त पडीकल याच्या ४० धावांची साथ लाभली. या तिघांनीच बंगळुरूचा विजय साकार केला.

प्रारंभी यशस्वी जयस्वालच्या अर्धशतकाच्या मदतीने राजस्थान रॉयल्सने आरसीबीसमोर १७४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. यशस्वीने उत्कृष्ट फलंदाजी करत ४७ चेंडूत १० चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ७५ धावा केल्या. राजस्थानने २० षटकांत चार गडी गमावत १७३ धावांपर्यंत मजल मारली. आरसीबीकडून भुवनेश्वर, यश दयाल, जोश हेझलवूड आणि कृणाल पंड्या यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.



## रॉयल खारघर संघ नगरसेवक चषकाचा मानकरी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप खारघर मंडल अध्यक्ष तथा माजी नगरसेवक प्रवीण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेवक चषक २०२५ ही टेनिस बॉल क्रिकेटची स्पर्धा खारघर येथे रविवारी (दि. १३) आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रॉयल खारघर संघाने बाजी मारून विजेतेपद पटकाविले.

जय तुळजाभवानी संघ उपविजेता ठरला. मालिकावीराचा किता अजित भोसले याने मिळवला. स्पर्धेत भाजप खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील यांच्यासह भूषण पाटील, शुभ पाटील, ओमकार बारगे, हितेन बोंबले, आकाश जगदाळे, संतोष नलावडे, पप्पू खामकर आदी उपस्थित होते. विजेते संघ आणि उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना गौरविण्यात आले.

## दुर्गापूर फ्रेंडसची सुप्रिमो चषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक

**मुंबई : प्रतिनिधी**

सुप्रिमो चषक क्रिकेट स्पर्धे तील आजवरचा सर्वाधिक यशस्वी बॅटसमन म्हणून आपली छाप निर्माण करणाऱ्या अयुब शेखने आपल्या घणाघाती अर्धशतकी फटकेबाजीच्या जोरावर दुर्गापूर फ्रेंडस युनियन क्लबला स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश मिळवून दिला.

दुर्गापूर फ्रेंडसने कंधारी किंगचा २६ धावांनी धुव्वा उडविला. अयुबने २८ चेंडूतील आपल्या खेळीत एक चौकार आणि पाच षटकार ठोकत नाबाद ६० धावांची अफलातून खेळी केली. सुप्रिमो चषक क्रिकेट स्पर्धेतील त्याचे आजवरचे हे चौथे अर्धशतक ठरले. अयुबला मॅन ऑफ द मॅचच्या किताबाने गौरविण्यात आले.

कंधारी किंग्सने उपांत्यपूर्व फेरीत नाणेफेक जिंकून दुर्गापूर फ्रेंडस युनियन क्लबला फलंदाजीस पाचारण केले. अयुबच्या फटकेबाजीच्या जोरावर दुर्गापूरने आठ षटकांत तीन विकेट्सच्या मोबदल्यात ८७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल कंधारी किंग ८ षटकांत आठ विकेटच्या मोबदल्यात फक्त ६१ धावांपर्यंतच मजल मारू शकला. दुर्गापूरतर्फे सर्वोनिल रायने ११ धावांच्या मोबदल्यात तीन विकेट्स घेतल्या.




सौजन्य : मंगेश आवळे


## द व्हॅली रनमध्ये वेदांत शिंदे व्दितीय




**मोहोपाडा : प्रतिनिधी**


लोणावळा आंबिवली येथे फेडरेशन ऑफ मोटर स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडियाने आयोजित केलेल्या मोटरसायकल स्पर्धेत रिस येथील वेदांत शिंदे याने द्वितीय क्रमांक मिळविला आहे. वेदांतने एका चाकावर कमी वेळेत ४०० मीटर अंतर १४ सेकंदात पार केले. वेदांत हा पोलीस उपनिरीक्षक सुधीर शिंदे व शिक्षिका निशा शिंदे यांचा चिरंजीव आहे. त्याचे अभिनंदन होत आहे.










ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।


विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।

वर्ष २० वे

वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ।। ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी ।। ज्ञान होय मूढा । अती मूर्ख त्या दगडा ।। वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी।।


सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।


तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत**
**माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित**

### अखंड हरिनाम सप्ताह

ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा.सु. ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, गुरुवार दि. १०/०४/२०२५ ते चैत्र कृ. ४ गुरुवार दि. १७/०४/२०२५ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वा.

**दैनंदिन कार्यक्रम**

व्यासपीठ चालक : ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.३० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०८.०० ते १०.०० वा. - कीर्तन
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

| वार/दिनांक | प्रवचन (सायं. ४ ते ५) | कीर्तन (रात्री ८ ते १०) |
|---|---|---|
| **मंगळवार** (दि. १५/०४/२०२५) | ह.भ.प. धावजी बाबा महाराज (जासई) | ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, देवाची आळंदी) कै. शिवाजी गजानन पाटील यांच्या स्मरणार्थ सौजन्य : सौ. ललिता सुनील पाटील (खारकोपर) |
| **बुधवार** (दि. १६/०४/२०२५) | सकाळी ८.३० वा. - ग्रंथराज ज्ञानेशरी पुजन सायं.४ ते ५ वा. - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा | ह.भ.प. गाथामूर्ती देवेंद्र महाराज निढाळकर (आळंदी देवाची) सौजन्य : सौ. श्रद्धा रमेशशेठ ठाकूर (खारकोपर) |

काल्याचे कीर्तन, गुरुवार, दि. १७/०४/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ वा. भाषाप्रभू ह.भ.प. जगन्नाथ महाराज (आसनगाव)
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत (शेलघर)


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com